रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १४६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

## एकनाथ शिंदेंविरोधात ठाकरे बंधू मैदानात

**मुंबई :** उद्धव ठाकरे गटाकडून पहिली तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दुसरी उमेदवार यादी घोषित करण्यात आली आहे. मनसेच्या उमेदवार यादीत ४५ उमेदवारांची नावे तर उद्धव ठाकरे यांच्या यादीत ६५ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. मनसेने अमित ठाकरे, संदीप देशपांडे, बाळा नांदगावकर, राजू पाटील यांसह अनेकांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यातच आता मनसेचे अविनाश जाधव यांनी गौप्यस्फोट करीत एकनाथ शिंदेंविरोधात मनसेचे अभिजीत पानसे योग्य उमेदवार असल्याचे सांगितले. तसेच अभिजीत पानसे हे एकनाथ शिंदे यांना तगडं आव्हान देतील, असेही अविनाश जाधव यांनी म्हटले. तर उद्धव ठाकरे गटाकडून केदार दिघे हे एकनाथ शिंदे यांच्या विरोधात मैदानात उतरले आहेत.

## बारामतीत काका विरोधात पुतण्या

**बारामती :** बारामतीमध्ये अजित पवार यांच्या विरोधात उमेदवार कोण असणार? याची चर्चा रंगली आहे. काही दिवसांपासून शरद पवार गटाकडून बारामतीमध्ये कोणाला संधी देणार? अशी चर्चा रंगली होती. आता युगेंद्र पवार हेच बारामतीमधून अजित पवार यांच्याविरोधात उमेदवार असतील असे स्पष्ट सुतोवाच राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की बारामतीमधून युगेंद्र पवार हेच उमेदवार असतील असे मला वाटते, अशी प्रतिक्रिया दिली. मुंब्रामधून अजित पवार यांनी आव्हाड यांच्या विरोधात नाजीम मुल्ला यांना उमेदवारी दिली आहे. या संदर्भात विचारले असता ते म्हणाले की, माझ्या विरोधात कोणीतरी उभा राहणारच आहे. दरम्यान जागा वाटपाचे अनुषंगाने विचारले असते ते म्हणाले की लवकरच जागांचा तिढा सुटणार आहे.

५वी ते ९वीच्या मराठी/सेमी इंग्लिश आणि CBSE पॅटर्नच्या विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट सर्च' परीक्षा
MKCL OLYMPIAD MOVEMENT
प्रवेशाची अंतिम तारीख दि. २० नोव्हेंबर
सर्व विषयांच्या पहिल्या सत्राचा अभ्यासक्रम व व्यक्तीमत्व विकास यावर आधारित १ तासाची परीक्षा
इयत्तावार परीक्षा व आकर्षक बक्षिसे
www.mkcl.org/mom
परीक्षेसाठी नजीकच्या MS-CIT/ क्लिक् सेंटरमध्ये नोंदणी करा 8956537496

### वेधक

## ऑक्सफर्ड विद्यापीठात आता मराठीचे धडे

**पुणे :** विश्वविख्यात ऑक्सफर्ड विद्यापीठात पहिल्यांदाच मराठी भाषेचे धडे दिले जाणार आहेत. विद्यापीठातील आशियाई आणि मध्यपूर्व अभ्यास विभागाने मराठी भाषेचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला असून, या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना मराठी शिकण्याची संधी मिळणार आहे. प्रा.अश्विनी मोकाशी यांना गेल्या शैक्षणिक वर्षात मला विद्यापीठातील एका वाचन गटाला संत बहिणाबाईंची गाथा या १७ व्या शतकातील ग्रंथाबाबत मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. तेव्हा आम्ही विद्यापीठात मराठी शिकवण्याचा विचार मांडला होता. सुदैवाने या वर्षी काही विद्यार्थ्यांना हिंदी व्यतिरिक्त दुसरी पान २ वर

## ४० विद्यार्थ्यांना मारहाण, शिक्षिका निलंबित

**सांगली :** महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील ४० मुलांना मारहाण केल्याप्रकरणी एका शिक्षिकेला निलंबित करण्यात आले असून मुख्याध्यापकांची अन्य शाळेत बदली करण्याचे आदेश आयुक्त शुभम गुप्ता यांनी दिले. सांगली महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ३९ मध्ये सहायक शिक्षिका विजया सुरेश शिंगाडे यांच्याकडून सुमारे ४० विद्यार्थ्यांना मारहाणीचा प्रकार घडला होता. या प्रकरणी महापालिकेच्या उपायुक्त विजया यादव, सहायक आयुक्त सचिन सागावकर व प्रशासन अधिकारी रंगराव आठवले यांनी चौकशी केली असता विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याचे निष्पन्न झाले.


## छोटा राजनला न्यायालयाचा दिलासा!

**मुंबई :** अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनला मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. हॉटेल व्यावसायिक जया शेट्टी हत्या प्रकरणात राजन याला जामीन मंजूर करण्यात आला असून याप्रकरणी मुंबई सत्र न्यायालयाने दिलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. छोटा राजनने शिक्षेला दिलेले आव्हान निकाली लागेपर्यंत स्थगिती कायम राहणार, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.दरम्यान, दिलासा मिळाला असला तरी छोटा राजनचा मुक्काम मात्र कारागृहातच राहणार आहे. २००१ मध्ये हॉटेल व्यावसायिक जया शेट्टीची खंडणीसाठी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती.

# आता होऊ दे खर्च

**| रायगड | प्रतिनिधी |**

**विधानसभा निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवाराला प्रचारावर खर्च करण्यासाठी खर्चाची मर्यादा २८ लाखांवरून ४० लाख करण्यात आली आहे. म्हणजेच १२ लाखांची वाढ करण्यात आली आहे. सभा, रॅली, जाहिराती यासारख्या प्रचाराच्या विविध माध्यमांवर उमेदवारांकडून निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला जातो. मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार करणे आवश्यक आहे. प्रचारासाठी प्रामुख्याने विविध प्रकारच्या वाहनांचा उपयोग केला जातो. कोणत्या वाहनाचे दर दिवशीचे किती रूपये भाडे राहील, हे निवडणूक विभागाने निश्चित केले आहे. त्यानुसार टाटा सुमो, बोलोरो, काळी-पिवळी, जीप यांचे इंधनासह दिवसाचे भाडे ३ हजार ८०० रूपये तर बैलगाडी, घोडागाडीचा प्रति तास दर २ रूपये ठरविण्यात आला आहे.**




**काही उमेदवार शहरात सायकल रिक्षाच्या माध्यमातून प्रचार करतात. त्यासाठी इंधन लागत नाही. त्यामुळे भाडे कमीच राहील. मात्र निवडणूक विभागाने सायकल रिक्षा, घोडागाडी, बैलगाडी, सायकल यासाठी प्रति तास केवळ दोन रूपये भाडे ठरविले आहे. ४०० रूपये दिवसाची मजुरी दिल्याशिवाय मजूर मिळत नाही, अशास्थितीत सायकल, सायकल रिक्षा, बैलगाडी केवळ दोन रूपये प्रति तास या दराने मिळणार काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

- **खर्चाच्या मर्यादेत १२ लाखांची वाढ**
- **खर्च सादर करणे राहील बंधनकारक**
- **खर्चाची मर्यादा ओलांडल्यास होणार कारवाई**

मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवाराला प्रचार करावा लागतो. यासाठी वाहने भाड्याने घेऊन त्यावर ध्वनीक्षेपक लावला जातो. तसेच बॅनर, पोस्टर तसेच वाहनाला बॅनर, पोस्टर बांधून उमेदवार प्रचार करतात. निवडणुकीदरम्यान, खर्चाची मर्यादा पाळणे उमेदवाराला आवश्यक आहे. यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीत ४० लाख रूपये खर्चाची मर्यादा देण्यात आली आहे. दर दिवशीचा खर्च उमेदवाराला निवडणूक विभागाकडे सादर करावा लागतो. खर्चाची मर्यादा ओलांडल्यास तो उमेदवार निवडून येऊनही त्याचे पद धोक्यात येण्याची शक्यता असते. कोणत्या वाहनासाठी किती रूपये दर राहणार आहे, हे ठरविण्याचा अधिकार निवडणूक विभागाला आहे. संबंधित उमेदवाराने त्या वाहनधारकाला किती रूपये दिले तरी निवडणूक विभागाकडे खर्च सादर करतेवेळी निवडणूक विभागाने ठरवून दिलेल्या दरानेच खर्च सादर करावा लागतो. त्यानुसार निवडणूक विभागाने वाहनांचे दर ठरवले आहेत.

निवडणूक खर्चाचा हिशेब जुळवतेवेळी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी निवडणूक विभागाने जवळपास सर्वच प्रकारच्या वाहनांचे दर ठरवले आहेत. सोबतच इंधनासह व इंधनाशिवाय असेसुद्धा वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसारच निवडणूक खर्च विभागाला सादर करणे आवश्यक आहे. ऑटोरिक्षाच्या माध्यमातूनही प्रचार केला जातो. निवडणूक विभागाने इंधनासह ऑटोरिक्षाचा दर प्रति दिवस १ हजार रूपये, सायकल रिक्षा प्रति तास २ रूपये, बैलगाडी, घोडागाडी, सायकल प्रति तास २ रूपये, दुचाकी प्रति तास २० रूपये, ट्रॉलिसोबत ट्रॅक्टर प्रति दिवस ३ हजार रूपये दर ठरविला आहे. ४० सिटर प्रवासी वाहनाचे इंधनाशिवाय दिवसाचे भाडे ७ हजार ७०० रूपये तर इंधनासह १० हजार ४०० रूपये दर ठरवला आहे. १८ सिटर वाहनाचे दिवसाचे इंधनाशिवाय भाडे ४ हजार ६२५ तर इंधनासोबतचे भाडे ५ हजार ७६० रूपये ठरविले आहे. ५० सिटर वाहनाचे इंधनासोबतचे भाडे १२ हजार १५० रूपये ठरविण्यात आले आहेत.मालवाहू वाहनासाठी पाच हजार रूपये मालवाहू हलक्या वाहनाचे इंधनासह भाडे ५ हजार २६० रूपये ठरविले आहे. १० चाकी वाहन असल्यास १२ हजार ८०० रूपये, १२ ते १४ चाकी वाहन १३ हजार ६०० रुपये, १६ चाकी वाहनाचे भाडे १५ हजार ७०० रूपये ठरविले आहे. त्यानुसार निवडणूक खर्च सादर करावा लागेल.

# आज चित्रलेखा पाटील, प्रीतम म्हात्रे भरणार अर्ज

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २२ ऑक्टोबरपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा मतदार संघातील शेकापचे अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील व उरण विधानसभा मतदार संघातील उमेदवार प्रीतम म्हात्रे गुरुवारी (दि.२४) उमेदवारी अर्ज भरणार आहेत. शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा प्रमुख, रायगड



जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहे. कोरोना काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, जनतेच्या हितासाठी त्या धावून गेल्या. रुग्णांना वेळीच उपचार मिळावा यासाठी प्रशासनाकडे सातत्याने त्यांनी पाठपुरावा केला. लॉकडाऊनच्या काळात गरजूंना मदतीचा हात देण्याचे काम त्यांनी केले. तसेच ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची वाट सुखकर व्हावी यासाठी त्यांनी २५ हजारहून अधिक मुलींना मोफत सायकली दिल्या.

शासनाच्या एक पाऊल पुढे टाकत अनेकांना ताईची सावली या घरकूल योजनेच्या माध्यमातून हक्काचे घर बांधण्याबरोबरच दुरुस्तीसाठी आर्थिक मदत केली. रायगड जिल्ह्यात टेनिस क्रिकेट स्पर्धेचा क्रेझ वाढला आहे. तरुणांना क्रिकेटमधून हक्काचे व्यासपिठ मिळावे. यासाठी आयपीएलच्या धर्तीवर पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धा भरवून पान २ वर

## मुख्यमंत्र्यांचे विश्वासू जरांगेंच्या भेटीला

**| जालना | प्रतिनिधी |**

लोकसभा निवडणुकीत अनेक दिग्गजांना मराठा मतांचा फटका बसला होता. त्यामुळे आता अनेक नेते हे सावधगिरीचा पर्याय अवलंबताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांपासून जालन्यातील अंतरवाली सराटीमध्ये विविध पक्षातील आमदार, नेते हे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत आहेत. या भेटीगाठी सहसा रात्री उशिरा किंवा पहाटे होत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वीय सहाय्यक आणि विश्वासू मंगेश चिवटे यांनी बुधवारी पहाटे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यामुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे. काल रात्री शिवसेना शिंदे गटाची यादी जाहीर झाली. मंगेश चिवटे यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या.

## स्नेहल जगताप-कामत यांचा गावभेट दौरा

**पोलादपूरच्या दोन प्रमुख कार्यकर्त्यांच्या प्रवेशाचे संकेत**

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

महाड विधानसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडीतील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत उमेदवार स्नेहल जगताप कामत यांचा शनिवारी (दि.२६) पोलादपूर तालुक्यातील गावभेट दौरा जाहीर झाला आहे. दरम्यान, पोलादपूर तालुक्यातील दोन महत्वाचे कार्यकर्ते या दौऱ्यामध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये जाहिर प्रवेश करणार असल्याचे संकेत दिले जात असल्याने तालुक्यातील सर्वपक्षीयांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

महाड विधानसभा मतदार संघातील प्रचारासाठी गेल्या काही दिवसांपासून रणनिती ठरविण्याचे काम पोलादपूर तालुक्यातील महाविकास आघाडीतील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सुरू केले आहे. यावेळी लोकसभा निवडणुकीप्रमाणे जरादेखील गाफीलपणा होऊ न देण्याची सतर्कता बाळगण्यात येत असल्याची माहिती पद्माकर मोरे यांनी दिली. पोलादपूर येथील श्रीसाईनाथ महाराज मंदिराजवळील तालुका संपर्क कार्यालयामध्ये बुधवारी झालेल्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीवेळी येत्या शनिवारी होणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील गावभेटीच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्यानंतर प्रसिध्दी माध्यमांना ही माहिती देण्यात आली. पान २ वर

# विमानांमध्ये बॉम्बची धमकी

## सहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईतील विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याचे धमकी सत्र सुरूच असून मंगळवारीही एक्स (ट्वीटर) हँडलद्वारे १० विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी प्राप्त झाली होती. याप्रकरणी सहारा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरूवात केली. विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी दिल्याबद्दल मुंबई पोलिसांनी दाखल केलेला हा १० गुन्हा आहे. या प्रकरणांमध्ये गुन्हे शाखाही समांतर तपास करीत आहे.

सहार पोलिसांनी अनोळखी ट्वीटर खातेधारकाविरोधात गुन्हा दाखल केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. याबाबत मंगळवारी एक्सद्वारे धमकी देण्यात आली. तपासणीत त्यात काहीच आढळले नाही. गेल्या १० दिवसांत मुंबई पोलिसांनी १० गुन्हे दाखल केले असून विमानात बॉम्ब असल्याचे संदेश अथवा ई-मेल करण्यात आले होते.



याप्रकरणी स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखाही समांतर तपास करीत आहे. गेल्या आठवड्याभरापासून धमक्यांचे सत्र सुरू असून सर्व विमानांमधील प्रवाशांची आणि सामानाची बारकाईने तपासणी करण्यात आली, परंतु त्यात काहीही संशयास्पद आढळले नाही.

आवश्यक तपासणीनंतर, धमक्या खोट्या असल्याचे निष्पन्न झाले. देशातील विविध एअरलाइन्सवर बॉम्बची माहिती रविवारी मिळाली होती. त्यात यूके १०६ पान २ वर

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**| रायगड | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत एकूण १०७ गुन्हे नोंदविण्यात आले असून ८८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. संपूर्ण कारवाईमध्ये ३७५२० लि.दारु जप्त करण्यात आली असून एकूण जप्त मुद्देमालाची किंमत रुपये २६ लाख ६१ हजार २१२ आहे. अवैध मद्याच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत इसम ांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम ९३ अंतर्गत एकूण ६१ प्रस्ताव विधानसभा मतदारसंघातील उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत.

# तरुणीचा लोकलमधून पडून मृत्यू

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जतमधील एका तरुणीचा लोकलमधून पडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ऋतुजा गणेश जंगम असे तरुणीचे नाव असून ती कर्जतमधील म्हाडा कॉलनी येथे राहत होती. मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास कामावरून परत येत असताना अंबरनाथ आणि बदलापूर दरम्यान लोकलमधून पडून ती गंभीर जखमी झाली. यात तिचा मृत्यू झाला आहे. ऋतुजा ही ठाण्यात एका खासगी ट्रॅव्हल कंपनीत कामाला होती. मंगळवारी (दि.२२) ती ठाण्याहून कर्जत ट्रेनने घरी परतत असताना अंबरनाथ रेल्वे स्थानकात गर्दीमुळे ती खाली उतरून पुन्हा ट्रेनमध्ये चढली. पण गर्दीमुळे तिला ट्रेनमध्ये जाता आले नाही. ती दारातच उभी राहिली. अंबरनाथ स्थानकातून ट्रेन पुढे गेल्यानंतर काही अंतरावर ट्रेनमधील गर्दीमुळे तिचा हात सुटून ती खाली पडली.



यामध्ये ती गंभीर जखमी झाली. या अपघाताची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिला उल्हासनगरच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले.

> **कर्जत ते मुंबई दरम्यान प्रवासी प्रवास करतात. प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असून त्यामानाने कर्जत ते मुंबई आणि मुंबई ते कर्जत लोकल संख्या खुप कमी असल्याने सकाळी आणि रात्रीच्या वेळी ट्रेनमध्ये प्रवाशांची कायम गर्दी असते. रेल्वे प्रशासनाने रेल्वेने प्रवास करणाऱ्या नागरिकांचा प्रवास सुखकर करण्यासाठी अधिकच्या लोकल फेऱ्या वाढविणे आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय योजना करणे गरजेचे आहे. ट्रेनच्या गर्दी मुळे प्रवाशांचा जीव जातो, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.**
> **-विजय हरिश्चंदे, रेल्वे प्रवासी संघटना, कर्जत**

**आचारसंहितेनंतर मिळणार नियुक्त्या; शाळा व्यवस्थापन समितीला निवडीचा अधिकार**

# झेडपी शाळांमध्ये आता अंशकालीन निदेशक!

**| रायगड | प्रतिनिधी |**

**जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांची (सहावी ते आठवीच्या वर्गांची) पटसंख्या १०० पेक्षा जास्त आहे, त्याठिकाणी आता कला, शारीरिक शिक्षण व आरोग्य आणि कार्यशिक्षणासाठी अंशकालीन निदेशक नेमला जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाने ४ हजार ७६७ जणांना नेमणुका देण्याचे आदेश काढले आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर त्या सर्वांची नियुक्ती केली जाणार आहे.**



जिल्हा परिषदेच्या शाळांमधील उच्च प्राथमिक वर्गातील (सहावी ते आठवी) विद्यार्थ्यांना कला शिक्षण, आरोग्य, कार्यानुभव, क्रीडा याविषयाचे ज्ञान व्हावे, विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहावे, त्यांच्यातील सुप्त

### ४५ दिवसांत अर्ज करण्याची मुदत

कलागुणांना वाव मिळावा म्हणून अंशकालीन निदेशक किंवा अतिथी निदेशक नेमण्याचा निर्णय यापूर्वी झाला आहे. पण, काही कारणांमुळे त्यांची सेवा खंडित करण्यात आली होती. त्यामुळे अनेकांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. न्यायालयाच्या आदेशानुसार सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी अंशकालीन निदेशक नेमण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला.

दरमहा सात हजार रुपयांच्या मानधनावर अंशकालीन निदेशक नेमले जाणार असून त्यांच्या नेमणुकांमुळे राज्यातील जिल्हा परिषदांच्या पावणेपाच हजार शाळांमधील विद्यार्थ्यांना देखील पुस्तकी ज्ञानाशिवाय कला, क्रीडा, कार्यानुभव, आरोग्य अशा विषयांवरील माहिती मिळणार आहे. पण, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या एक दिवस अगोदर हा निर्णय निघाल्याने त्या निदेशकांच्या नेमणुकांसाठी आणखी काही दिवस वाट पहावी लागणार आहे.

### आदेशापासून ४५ दिवसांत अर्जाचे बंधन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी १४ ऑक्टोबरला अंशकालीन निदेशक, अतिथी निदेशकांना नेमणुका द्याव्यात, असे आदेश काढले. पण, दुसऱ्याच दिवशी आचारसंहिता लागू झाल्याने त्यांच्या नियुक्त्या आता निवडणुकीनंतरच दिल्या जाणार आहेत. तत्पूर्वी, आदेश निघाल्यापासून ४५ दिवसांत पूर्वीपासून अंशकालीन निदेशक ज्या शाळांवर कार्यरत होते, त्याच शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीकडे अर्ज करावा लागणार आहे.**

## 'झोपु' योजनांतील विकसकांची हकालपट्टी

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

स्वीकृत झाल्यानंतरही इरादा पत्र न घेतलेल्या ५१७ झोपडपट्टी पुनर्विकास योजनांपैकी सुमारे अडीचशेहून अधिक योजनांमधील विकासकांना प्राधिकरणाने काढून टाकले असून या योजनांमध्ये नवा विकासक नेमण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या योजना गेल्या अनेक वर्षांपासून ठप्प होत्या. झोपु योजना पूर्ण करण्याची तयारी नसलेल्या उर्वरित योजनांतील विकासकांचीही हकालपट्टी केली जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

झोपडपट्टी पुनर्विकासासाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर तो सुरुवातीला प्राधिकरणाकडून स्वीकृत केला जातो. प्रस्ताव स्वीकृत झाल्यानंतर आवश्यक ती ना हरकत प्रमाणपत्रे तसेच आर्थिक क्षमता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर इरादा पत्र तसेच परिशिष्ट दोन जारी करण्याची कार्यवाही केली जाते. योजना स्वीकृत झाल्यानंतर विकासकाने इरादा पत्र मिळविण्यासाठी हालचाल करणे आवश्यक असते. परंतु ५१७ योजनांमध्ये विकासकांनी काहीच हालचाल केली नसल्याचे स्पष्ट झाले. या ५१७ योजनांतील विकासकांची नियुक्ती रद्द करण्याची सरसकट कारवाई प्राधिकरणाने केली होती. त्यास आक्षेप घेत विकासकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयानेही प्रत्येक प्रकरणानजीक सुनावणी घेऊन कारवाई करण्याचे आदेश प्राधिकरणाला दिले होते.

# आयुष्मान कार्डअभावी लाभार्थी वंचित

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**देशातील नागरिकांना पाच लाखांपर्यंतचा आरोग्य विमा केंद्र सरकारने उपलब्ध करून दिला आहे; मात्र योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड बंधनकारक आहे. याबाबत अनेक नागरिक अनभिज्ञ असल्याने योजनेपासून वंचित आहेत. रायगड जिल्ह्यातील ६५ टक्के लाभार्थ्यांकडे आयुष्मान कार्ड नसल्याचे समोर आले आहे.**




आयुष्मान भारत योजनेचा पिवळ्या, केशरी आणि पांढऱ्या अशा तिन्ही शिधापत्रिकाधारकांना लाभ मिळू शकतो. अगदी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही योजनेचा लाभ मिळू शकतो; मात्र त्यासाठी प्रत्येकाकडे आयुष्मान कार्ड असणे बंधनकारक आहे. आधार कार्ड आणि रेशन कार्डचे प्रमाणिकरण करून हे कार्ड मोफत काढता येते.

अगदी घरबसल्या पोर्टलच्या माध्यमातून कार्ड काढता येते; मात्र याबाबत जनजागृती न झाल्याने नागरिक योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत.देशातील प्रत्येक नागरिकांना आरोग्य विम्याचा लाभ मिळावा, यासाठी चार वर्षांपूर्वी ही योजना सुरू करण्यात आली; मात्र योग्य प्रचार व जनजागृती न झाल्याने आजही अनेक नागरिकांपर्यंत विशेषतः ग्रामीण भागात योजनेची माहिती पोहोचलेली नाही.

रायगड जिल्ह्यात आयुष्मान भारत योजनेअंतर्गत २२ लाख ९० हजार पात्र लाभार्थी आहेत. यापैकी सहा लाख लाभार्थ्यांकडे आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध आहे. तर, उर्वरित अठरा लाख लाभार्थ्यांकडे आयुष्मान कार्ड उपलब्ध नाही. त्यामुळे योजनेसाठी पात्र असूनही त्यांना लाभ मिळू शकणार नाही.

जुलै ते सप्टेंबर या चार महिन्यांत आयुष्मान भारत योजनेचा रायगड जिल्ह्यातील सहा हजार १६७ रुग्णांना लाभ मिळाला. त्यांना ६७ कोटी रुपयांपर्यंतच्या आरोग्य चिकित्सा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आजारी पडल्यावर लोकांना कार्डाची आठवण येते; मात्र आयत्यावेळी कार्ड मिळवण्यासाठी धावपळ करावी लागते, त्यामुळे नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

> **अल्पउत्पन्न असणाऱ्या गटासाठी ही खूपच चांगली योजना आहे. योजनेतून पाच लाखापर्यंतचा वैद्यकीय खर्च करता येतो. अगदी घरबसल्या याची नोंदणी होऊ शकते. जास्तीत जास्त लोकांनी कार्ड काढावे, यासाठी जनजागृती केली जात आहे.– डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड.**

> **पात्र लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढून घ्यावे. जिल्हा प्रशासनाला आयुष्मान कार्डांच्या वितरणासाठी व्यापक मोहीम राबवण्याचे तसेच पुढील तीन महिन्यांत किमान पन्नास टक्के लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डांचे मोफत वितरण करावे, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले.**
> **– डॉ. ओमप्रकाश शेट्ये, प्रमुख, आयुष्मान भारत मिशन.**

# मुरुड-महाड गाडीतून निघाला धूर

**। चणेरा । वार्ताहर।**

मुरुड-महाड गाडी तळेखार नजीक आल्यानंतर अचानक धूर निघाल्याने प्रवासी वर्ग भयभीत झाला होता. वाहन चालकाने प्रसंगावधान राखून गाडी थांबविल्याने सर्व प्रवासी सुखरूपपणे खाली उतरले. या आठवड्याभरात मुरुड आगाराच्या तीन गाड्यांमध्ये रस्त्यामध्ये बिघाड होऊन बंद पडल्याने प्रवासी वर्गांचे मोठे हाल झाले आहेत. त्यामुळे आता मुरुड आगाराला घरघर लागली की काय अशी शंका निर्माण होत आहे. रस्त्यात गाड्या बंद पडण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

१५ ऑक्टोबर रोजी मुरुड-स्वारगेट गाडी रेवदंडा परिसरात मागील टायर पंचर झाल्याने वाहन चालकाने कशीबशी गाडी अलिबाग आगारापर्यंत पोहोचवली होती. १७ ऑक्टोबर रोजी मुरुड-बोरीवली गाडी बोर्ली मांडला येथे पंक्चर झाल्याने प्रवाशांना तेथेच उतरावे लागले होते. सदर



दोन्ही पंक्चर गाड्यांमध्ये स्टेपनी नसल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले होते. या दोन्ही घटना ताज्या असताना मुरुड महाड गाडी सकाळी निघाली. ही गाडी सीएनजी होती. ती गाडी चोरढे - सावरोली सोडल्यानंतर तळेखार नजीक येताच अचानक या गाडीतून धूर येऊ लागला. गाडीमध्ये सर्वत्र धूर झाल्याने प्रवासी घाबरले. चालकाने तात्काळ गाडी बाजूला थांबवली त्यानंतर सर्व प्रवासी खाली उतरले कोणालाही दुखापत झाली नाही. महिन्याभरापूर्वी रेवदंडा परिसरात अशाच मुरुड सीएनजी गाडीत बिघाड झाला होता. या गाडीतून धूर निघाला होता. सदर सीएनजी गाड्यांचे मेकॅनिक अलिबाग मुरुड व रोहा आगारात उपलब्ध नसल्याने दुरुस्तीसाठी अडचण येत आहे. प्रवाशांनी किती त्रास सहन करायचा जर सीएनजी गाडी दिली तर त्यांचे मेकॅनिक सुद्धा द्यावेत व गाड्या पूर्णपणे तपासल्याशिवाय सोडू नये, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

# मुरूड आगाराला टाळे लावण्यार

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड आगारात असलेल्या भंगार एसटीमुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या संदर्भात अनेक लेखी तक्रारी देऊन सुध्दा आगार व्यवस्थापकाकडुन कोणतीही कारवाई व सुधारणा होताना दिसत नसल्याने डीसी यांनी दोन दिवसांत मुरुड आगारात येऊन प्रवाशांच्या समस्या जाणुन तक्रारींचे निवारण करावे अन्यथा मुरुड आगाराला टाळे लावुन आंदोलन करणार असा इशारा अरविंद गायकर यांनी दिला आहे.

# माणगावमध्ये ब्लँकेटचे वाटप

**। माणगाव । वार्ताहर ।**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या चॅरिझेन व रेड हाऊस (शंतनू कुकडे) फाऊंडेशन यांच्यामार्फत माणगाव शहरातील बहुजन समाजातील गोरगरीब जनतेला सोमवार दि.२१ ऑक्टोबर रोजी माणगाव एकतानगर येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा रुपेश जाधव यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

सुवर्णा जाधव या माणगाव तालुक्यासह मुंबईत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून बहुजन समाजात काम करीत आहेत. गोरगरीब जनतेला मदत करणे या कामी त्यांना विशेष आवड आहे. गरिबांना तसेच बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने त्या काम करीत आहेत. नजीकच्याच काळात माणगाव शहरात विविध छोटे, मोठे उद्योग सुरु करण्याचा त्यांचा प्रामाणिक मानस आहे. यातून गोरगरीब जनतेला रोजगार उपलब्ध होऊन त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागेल असे त्यांचे मत आहे. गरीब जनतेसाठी समाजात काम करीत असल्याने त्यांच्या विशेष प्रयत्नांनी चॅरिझेन व रेड हाऊस फाऊंडेशन यांच्या सहकार्याने त्यांनी माणगाव शहरातील गोरगरीब अशा ३०० लोकांना सोमवारी ब्लँकेटचे वाटप आपल्या हस्ते केले. त्यावेळी उपस्थितीत महिलांनी व नागरिकांनी फाऊंडेशन बरोबरच सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांचे विशेष ऋण व आभार व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, मौजे नेरळ ता. कर्जत जि.रायगड येथील स.नं.९० हिस्सा नंबर ७ पार्ट नवीन स.नं. ४०४ प्लॉट नंबर ७१ अशा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत दस्त क्रमांक ५१९४/२०२३ दिनांक १८.०९.२०२३ आमचे अशिल नेक्सजेन कन्स्ट्रक्शन यांचे नावे केलेले होते. सदर रजिस्टर खरेदीखताचा मुळ दस्त मरियम रेसिडेंसी प्लॅट नंबर ७०२, ४७ मोहम्मद शहीद मार्ग जंक्शन ऑफ मोरलँन्ड अॅन्ड रेयनॉल्ड रोड सेंट जोसेफ गर्लस हायस्कुल आग्रीपाडा मुंबई येथून गहाळ झालेले आहेत. त्याबाबत दिनांक २२.०७.२०२४ रोजी आग्रीपाडा मुंबई पोलीस स्टेशन येथे रितसर मुळ दस्त हरविल्याची मिसींग कंम्प्लेट नोंदवीली असून त्यांचा नंबर ८२१६०-२०२४ असा आहे. याबाबत सदर खरेदीखताचा मुळ दस्त मिळाल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर आणुन देण्याची कृपा करावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**अॅड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट ब्लॉक नंबर १०१
ममदापूर रोड नेरळ ता.कर्जत जि.रायगड
फोन नंबर ९८८१२७९८१७

पान १ वरून

## आज चित्रलेखा पाटील, प्रीतम म्हात्रे भरणार अर्ज

स्थानिक खेळाडूंना खेळाची संधी उपलब्ध करून दिली. वैद्यकीय सेवांसह अडचणीच्या वेळेला त्या कायमच प्रत्येकाच्या मदतीला धावून गेल्या आहेत.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मंगळवारी सभेमध्ये चित्रलेखा पाटील यांची उमेदवारी जाहीर करताच कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. विशेष म्हणजे महिला वर्गांनी हा आनंद नृत्यांनी साजरा केला. चित्रलेखा पाटील यांच्या उमेदवारीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला असून चित्रलेखा पाटील यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे.

उरण विधानसभा मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे राजकीय, सामाजिक, आदी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. पनवेल महानगर पालिकेचे नगरसेवक म्हणून काम करीत असताना जनतेचे प्रश्नांची सोडवणूक करण्याचा त्यांनी सातत्यांनी प्रयत्न केला. सामाजिक बांधिलकी जपत अनेकांना त्यांनी मदतीचा हात दिला. त्यांचीदेखील उमेदवारी जाहीर होताच कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

## स्नेहल जगताप-कामत यांचा गांवभेट दौरा

शनिवारी १२ वाजता लहुळसे, १२.३० वाजता करंजे आदिवासीवाडी, १.३० वाजता करंजे, २ वाजता देवळे, ३ वाजता दाभिळ, ३.३० वाजता रानकडसरी बावळी, ४.३० वाजता नाणेघोळ, ५ वाजता केवनाळे, ५.३० वाजता नाणेघोळ आदिवासी वाडी असा स्नेहल जगताप कामत यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या दौऱ्यामध्ये पोलादपूर तालुक्यातील दोन खंदे कार्यकर्ते शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याची चर्चा सोशल मिडीयाद्वारे व्हायरल होत असून संपूर्ण तालुक्यात या फटाक्याच्या आवाजाची प्रतीक्षा आणि उत्कंठा वाढली आहे.

## विमानांमध्ये बॉम्बची धमकी

(सिंगापूर-मुंबई) आणि यूके १०७ (मुंबई-सिंगापूर) यासह विस्तारा एअरलाइन्सला त्यांच्या सहा विमानांसाठी धमक्या मिळाल्या. अकासा एअरला देखील क्यूपी १०२ (अहमदाबा-मुंबई), क्यूपी १३८५ (मुंबई ते बागडोगरा), क्यूपी १५१९ (कोची-मुंबई) आणि क्यूपी १५२६ (लखनौ - मुंबई) यासह अनेक विमानांबाबत सतर्कतेचे आदेश देण्यात आले होते. इंडिगो एअरलाइन्सने ६ ई ५८ (जेद्दा-मुंबई) आणि ६ ई १७ (मुंबई-इस्तंबूल) या सहा विमानांवर सुरक्षा सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. प्रत्येक विमानांची व प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करण्यात आली. तपासणीत सर्व धमक्या अथवा संदेश खोटे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच उदयपूर-मुंबई विमानामध्ये बॉम्ब असल्याचे टिश्यू पेपरवर लिहिण्यात आले होते. तो संदेशही खोटा असल्याचे निष्पन्न झाले होते.

सहार पोलिसांनी गेल्या आठवड्यात छत्तीसगडमधून एका १७ वर्षीय विद्यार्थ्याला पकडले होते. एका व्यक्तीच्या नावाने एक्स या समाज माध्यमावर खाते तयार करून धमकीचा संदेश पोस्ट केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. त्या व्यक्तीसोबतच्या जून्या वादावरून त्याने त्याला अडवकण्यासाठी हा प्रकार केला होता.

## ऑक्सफर्ड विद्यापीठात आता मराठीचे धडे

भारतीय भाषा शिकायची होती आणि त्यांना मराठी शिकण्यात रस होता. त्यामुळे आम्ही मराठीचा अभ्यासक्रम शिकविण्याचा निर्णय घेतला. या पूर्वी कधी ऑक्सफर्ड विद्यापीठात मराठी भाषा शिकवली गेलेली नाही. आशियाई आणि मध्यपूर्व अभ्यास विभागात सुमारे १३० विद्यार्थी आहेत. या विभागात जगभरातून विद्यार्थी येतात. मराठी भाषा अभ्यासक्रमात विद्यार्थी प्राथमिक पातळीवर शैक्षणिक मराठी शिकतील. देवनागरी लिपीपासून सुरुवात होऊन व्याकरण, शब्दसंग्रह, वाचन, ऐकण्याचा आणि बोलण्याचा सराव करतील. या वर्षाअखेरीस ते सोपे मराठी बोलायला आणि लिहायला शिकतील. तसेच गद्या आणि पद्या वाचन करू शकतील. माझ्या माहिती प्रमाणे इंग्लंडमध्ये मराठी भाषेचा अन्य अभ्यासक्रम सुरू नाही. परंतु बऱ्याच वर्षांपूर्वी लंडनला स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज (एस-ओएएस) या महाविद्यालयात मराठी अभ्यासक्रम सुरू होता, असे प्रा. मोकाशी यांनी सांगितले.



## पनवेल महानगरपालिका, पनवेल

LiFE Lifestyle for Environment | Majhi Vasundhara

### जाहीर आवाहन

**माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाके व पर्यावरणपूरक सण-उत्सव अनुषंगाने वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत.**

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी O. A . No. ६८१ / २०१८ अंतर्गत सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना आपत्कालीन परिस्थितीत हवेच्या गुणवत्तेच्या संबंधी आवश्यक कार्यवाहीचा सल्ला देण्यासाठी दिल्ली एनसीआरप्रमाणे जीआरएपी अंतर्गत टास्क फोर्ससारखी योग्य यंत्रणा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारणे कामी विविध उपाय योजना आणि जनजागृती उपक्रम पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत.आपण वैश्विक वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या आणि तापमानवाढीच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्वाचे कारण आहे. विविध सण / उत्सव प्रसंगी आपण फोडत असलेल्या फटाक्यांमुळे कार्बन डायऑक्साईड व सल्फरचे तसेच इतर विषारी वायूंचे प्रमाण वाढत असून, कार्बन डायऑक्साईड व सल्फरच्या वाढत्या प्रमाणामुळे हवेच्या प्रदूषणाची पातळी वाढत असून शहरातील हवेचा गुणवत्ता स्तर खालावण्याची शक्यता नाकारता येत नाही. फटाक्यांमधून उत्सर्जित होणारे विषारी वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच सर्व मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात.हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरु करु शकतो.

करिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, " माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाकेमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल सण-उत्सव साजरे करावेत. पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरा करण्यामध्ये पुढाकार घेत नागरीकांनी दिपावली कालावधीमध्ये फटाक्यांच्या वापर शक्यतो टाळावा. तथापि, दिवाळीच्या पूर्वसंध्येला फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू आणि ध्वनी प्रदूषणाबाबत रिट याचिका (सिव्हिल) क्र. ७२८/२०१५ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याचे निर्देश दिले तसेच केवळ आवाज मुक्त प्रकाश फटाक्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहे या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरून फटाके फोडणाऱ्यांनी केवळ रात्री १० वाजण्याआधीच फोडावेत असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

जा.क्र/प.महा/पर्या./३९२४/प्र.क्र १४/ २७५ /२०२४.
दिनांक: २३/१०/२०२४.

**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**
**पनवेल**






## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल जि. रायगड-४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.:०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय:०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१
ई-मेल:panveleorportation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/प.महा/पर्या./३९२४/प्र.क्र.१४/२७२/२०२४ दिनांक : २३/१०/२०२४

### जाहीर आवाहन

पनवेल शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.SR. ६८२(E) dt ५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे.

१२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ज्या फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, आर्सेनिक, लोड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात. हे विषारी वायू माणसांबरोबर प्राणी व वनस्पती यांसाठीही घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र.१५२/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाके विक्रेत्यांनी विस्फोटक अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंधात्मक नियमांची अंमलबजावणी फटाके विक्रेत्यांनी करणे आवश्यक आहे.

करीता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फटाके विक्री करणारे व्यवसायिक व फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करु नयेत. तसेच परवानगी असलेले फटाके पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करावी.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ५.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानांतर्गत फटाकेमुक्त, प्लॉस्टिकमुक्त, कचरामुक्त व पर्यावरणपुरक सण-उत्सव साजरे करण्याबाबत सर्व नागरीकांना आवाहन केले आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० अभियानांतर्गत पर्यावरण पूरक सण उत्सव साजरे करताना नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, एकल वापर प्लॉस्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा, सण समारंभामध्ये पुनर्वापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीत जास्त करावा, पर्यावरण पुरक प्रदुषणमुक्त आरोग्यदायी दिपावली साजरी करावी.

चला तर मग! येणारी दिपावली हरित व पर्यावरण पुरक दिपावली म्हणून साजरी करूया. ही दिवाळी आपणासाठी व आपल्या परीवारासाठी आनंदी व सुरक्षित राहो. सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

सही/-
**(डॉ. वैभव विधाते)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**


**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ८६/२०२४
दिनांक- २३/१०/२०२४
जा. क्र.-

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग - अर्जदार
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक

विरूद्ध

१. श्री प्रल्हाद कृष्णा कोळी
पत्ता :- मु. बोडणी पो. मांडवा ता.अलिबाग जि. रायगड
२. श्री नथुराम सिताराम मोहिते - जाब देणार
पत्ता :- मु. वरवडणे पो. मेढा ता. रोहा जि. रायगड
३. श्री प्रशांत तुळशीराम जाधव
पत्ता :- मु. पो. ता.अलिबाग जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु ३,१८,३५६/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक ३०/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ३,१८,३५६/- (अक्षरी रुपये तीन लाख अठरा हजार तीनशे छपन्न मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ३०/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक ३ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २३/०८/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक ३ यांना बजाविली गेली नाही. त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २५/११/२०२४ रोजी दिवसाचे दुपारचे १२.३० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/ शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून अर्जाची चौकशी करुन अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २३/१०/२०२४ सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

**निवडक**

## सराईत गुन्हेगार गजाआड

**पनवेल :** परिसरातून एक दुचाकी चोरीला गेली होती. या प्रकरणाचा समांतर तपास पनवेल गुन्हे शाखा कक्ष २ चे वपोनि उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली असताना हा आरोपी विक्रोळी परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली. यानुसार त्या ठिकाणी सापळा रचून नासिर सद्दाम खान याला ताब्यात घेतले असता त्याच्याकडून पनवेल परिसरातून चोरी केलेली दुचाकी हस्तगत करण्यात आली आहे. यापूर्वी त्याने कामोठे परिसरातून दुचाकी चोरल्याचे निष्पन्न झाले आहे.

## महिला पोलिसाची आत्महत्या

**पनवेल :** कौटुंबिक वादातून एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मॅरेथॉन सोसायटीमध्ये राहणाऱ्या स्नेहा खोत या पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कौटुंबिक वादातून राहत्या घरातील बेडरुमच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## कारमधून रोकड लंपास

**पनवेल :** बांधकाम व्यावसायिक प्रशांत पिंगळे पनवेल येथे कामानिमित्त गेले होते. यावेळी त्यांनी आपली महिंद्रा एक्सयुव्ही कार गार्डन हॉटेलजवळ असलेल्या ओमसाई बिल्डींगसमोर उभी केली होती. यानंतर ते कामानिमित्त निघून गेले असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या कारची काच फोडून सीटवर ठेवलेली ६ लाख रुपयांची रोख रक्कम असलेली लेदर बॅग चोरुन नेली. प्रशांत पिंगळे कारजवळ आल्यानंतर त्यांना कार मधील रोख रक्कमेची बॅग चोरुन नेल्याचे निदर्शनास आले.

## पनवेलमधून दुचाकीची चोरी

**पनवेल :** नवीन पनवेल येथून अज्ञात चोरट्यांनी दुचाकी चोरी केल्याची घटना घडली असून ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेली आहे. नवीन पनवेल येथील हॉटेल कोल्हापुरी स्पाइस येथून प्रदीप माळी नावाच्या तरूणाची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. येथील सीसीटीव्ही कॅमेरात माळी यांची दुचाकी एक तरुण घेऊन जाताना दिसत आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस चोराचा शोध घेत आहेत.

## वेश्या व्यवसायावर कारवाई

**पनवेल :** नवी मुंबई गुन्हेशाखा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि पृथ्वीराज घोरपडे यांना माहिती मिळाली होती की, एक महिला वेश्याव्यवसायाकरीता ग्राहकांना महिला व मुली दाखवून अली अपार्टमेंटच्या बाजुला असणाऱ्या बिल्डींगमधील रूममध्ये बोलावुन वेश्या व्यवसाय करवून घेत आहे. यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी बनावट ग्राहकाला पाठवून सापळा रचला होता. यानंतर पथकाने रात्रीच्या वेळी ठिकाणी छापा टाकला.

# पावसामुळे भात कापणी लांबणीवर

## बहरलेल्या भात शेतीवर तुडतुड्याचा धोका

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने भात कापणी लांबणीवर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यातच बहरलेल्या भात शेतीवर तुडतुड्याचा धोका निर्माण झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.**



जिल्ह्यामध्ये ९४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात पिकांची लागवड करण्यात आली आहे. कोलम, सुवर्णा, रत्ना अशा अनेक पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. भातपीक बहरले आहे. काही ठिकाणी भातपीक कापणी योग्य आहे. तर, काही ठिकाणी आठ ते दहा दिवसांमध्ये कापणीला सुरुवात होण्याचे चित्र आहे. मात्र, रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या आठ दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे अनेक भागातील भातपीक आडवे झाले आहे. तसेच, शेतातील सखल भागात पाणी साचल्यामुळे भातपीक अडचणीत येण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तयार झालेल्या पिकाच्या कापणीला पावसामुळे अडथळा निर्माण झाला असून भात कापणी लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

> भात पीक चांगल्या पध्दतीने बहरले आहे. परंतु बदलत्या वातावरणामुळे भात पिकांवर त्यांचा मोठा परिणाम होऊ लागला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून भात पिकांवर तुडतुड्या व अन्य कीड रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. हातातोंडाशी आलेला घास या रोगांमुळे जाण्याची भिती आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.
> – रुपेश पाटील, शेतकरी

> यावर्षी पाऊस समाधानकारक पडला. भातपिकाला पोषक असे वातावरण निर्माण झाले होते. भातपिक बहरून कापणीच्या तयारीत होते. मात्र, परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. पावसामुळे कापणीचे काम लांबणीवर गेले आहे. त्यामुळे उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.
> – सतीश म्हात्रे, प्रगतीशील शेतकरी

### पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव

**परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांसमोर संकट निर्माण होत असताना भात पिकांवर तुडतुड्या व इतर किड रोगाचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. महाजनेसह बामणगाव, सुडकोली परिसरात भात पिकांवर या रोगांचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढू लागला आहे. याबाबत कृषी विभागाला माहिती देऊनही संबंधित विभागाकडून दखल घेतली जात नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**



## गतिरोधकासमोरच पडले खड्डे

### वाहन चालकांची मोठी कसरत

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सुतारवाडी पासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या हेटवणे गावाच्या समोर गतीरोधक आहेत. मात्र, या गतीरोधकाजवळ मोठमोठे खड्डे निर्माण झाल्या असल्यामुळे वाहन चालकाला मोठी कसरत करून मार्ग काढावा लागत आहे. यावेळी खड्डा चुकवण्याच्या नादात वाहनांची समोरासमोर धडक होऊन मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. याकडे कोणीही अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे धोका निर्माण झालेला आहे.

कोलाड-सुतारवाडी या मार्गावरून सातत्याने लहान मोठी वाहने त्याचप्रमाणे अवजड वाहने ये-जा करत असल्यामुळे सुसज्ज असलेला रस्ता आता खड्डेमय होत चाललेला आहे. रात्री या मार्गावरून एखादे वाहन विशेषतः दुचाकीचालक जात असेल तर त्याला खड्ड्यांचा अंदाज न आल्यामुळे वाहने खड्ड्यात आपटून अपघात होऊ शकतो.

कोलाड-सुतारवाडी मार्गे पुण्याकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग असल्यामुळे या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. त्याचप्रमाणे सुतारवाडी परिसरात अनेक फार्म हाऊस असल्यामुळे पर्यटकही मोठ्या प्रमाणावर येत असतात. तरी संबंधित अधिकारी वर्गाने लक्ष देऊन हे खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून होत आहे.

## चौलमधील असंख्य तरुण शेकापमध्ये

### चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते स्वागत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल येथील असंख्य तरुणांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख तथा अलिबाग विधानसभा मतदार संघातील शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या हस्ते सर्व कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



शेकापच्या चित्रलेखा पाटील यांनी कोरोना काळात उल्लेखनीय कामगिरी केली. यामुळे अनेकांना मदतीचा हात मिळाला. तसेच, ग्रामीण भागातील मुली शिकल्या पाहिजेत, या भुमिकेतून त्यांनी मुलींना सायकली वाटप केल्या. त्यांच्या अनेक कामांबाबत अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदार संघातील नागरिक प्रभावीत झाले आहेत. त्यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन चौल मधल्या तरूणांनी शेकापमध्ये प्रवेश केला आहे. हा छोटेखानी पक्ष प्रवेश सोहळा मंगळवारी (दि.२२) सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शेकापचे सुरेश घरत व नवनिर्वाचित तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **रखडलेले रस्ते पूर्ण करण्यासाठी, तरुणांना रोजगार मिळण्यासाठी चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केला आहे. चित्रलेखा पाटील आमदार झाल्यावर नक्कीच मागण्या पूर्ण करतील ही खात्री आहे.**
> **– चौलमधील नवनिर्वाचित कार्यकर्ते**

## आकर्षक पणत्या उरणमध्ये दाखल

**। उरण । वार्ताहर ।**

दिवाळी सण काही दिवसांवर आला असून बाजारात ग्राहकांची खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. मातीची पणती ही दिवाळीचे प्रमुख आकर्षण आहे. पणत्या उरण बाजारपेठेत दाखल झाल्याने नागरिकांकडून पणती खरेदी सुरू झाली आहे.

दिवाळीच्या ३ दिवसांत ज्यांच्या घरी दिवे लागत नाहीत त्यांच्या घरी नेहमीच अंधकार राहतो. ते प्रकाशाकडे म्हणजे ज्ञानाकडे, सकारात्मक ऊर्जेकडे जाऊ शकत नाही, अशी आस्था आहे. आपल्या घरी सदैव लक्ष्मीचा वास व ज्ञानाचा प्रकाश असावा यासाठी प्रत्येकाने दिवाळीत आपल्या घरो-दारी दिवे लावणे गरजेचे आहे. तसेच, घरात सुखसमृद्धी राहाते. अशी सर्वांची मनोभावना असल्याने आणि शास्त्रात तसे नमूद केल्याने दिव्यांच्या सणाला म्हणजे दिवाळीला मातीच्या पणतींना मोठे महत्त्व आहे.उरण शहरात उरण कोट नाका, कोट गाव, आनंदी हॉटेल जवळ व हात गाड्यांवर पणत्या विकायला आल्या असून मोठ्या प्रमाणावर नागरिक खरेदी करतांना दिसत आहेत. परंतु, पारंपरिक मातीच्या पणत्यांची मागणी कमी होत चालली आहे.



## अलिबागमधील पत्रकारांची आरोग्य तपासणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे रायगड जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या सहकार्याने मंगळवारी (दि.२२) अलिबागमधील पत्रकार व पत्रकारांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी तसेच आयुष्यमान भारत (आभा ) कार्ड नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ४०हून अधिक जणांनी सहभाग घेऊन या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.



या उपक्रमाच्या निमित्ताने मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांचा निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवामाने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर व अलिबाग प्रेस असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, सभासद, पत्रकार व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

मराठी पत्रकार परिषदेतर्फे पत्रकारांसाठी सर्व जिल्ह्यांमध्ये तलुकापातळीवर आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर यांनी दिली.अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोवडेकर यांनी प्रास्तविक केले. अलिबाग प्रेस असोसिएशनचे सचिव राजेश भोस्तेकर यांनी आभार व्यक्त केले. महेश पोरे यांनी सूत्रसंचालन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. डॉ. शीतल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या डॉक्टर आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## दक्षिण काशी विकासाच्या प्रतीक्षेत

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

रायगडचे दक्षिण काशी म्हणून समजले जाणारे मुरुड तालुक्यातील एकदरा डोंगरापलीकडे समुद्रकाठी वसलेले शंकराचे पवित्र स्थान आहे. या परिसराला गोमुख नावाने ओळखले जाते. काळ्या खडकात डोंगराच्या कपारीत वासलेले हे गोमुख पर्यटकांचे अतिशय आवडते ठिकाण आहे. तसेच, गोमुखासमोर विशाल समुद्र, डाव्या बाजूला अभेद्य जंजिरा किल्ला तर उजव्या बाजूला पद्मदुर्ग किल्ला आहे. अश्या विशेष पर्यटन स्थळाला विकासासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.



रायगडचे विद्यमान खासदारांनी एकदरा पूल ते गोमुख मार्गे खोरा बंदर रस्ता करून परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी प्रस्ताव तयार केला होता. परंतु, पुढे कोणतीही हालचाल झालेली नाही.

> गोमुखावर महाशिवरात्रीला सकाळपासून भक्तांची दर्शनासाठी रांग लागते. सध्या भक्तांना एकदरा गावातून खराब रस्तावरुन चालत जावे लागते. सुशोभिकरणाचा प्रस्ताव झाला तर भक्त व पर्यटक आपली गाडी गोमुखावर घेऊन जाऊ शकतात. तसेच, या परिसरातील निसर्गाचे नयनरम्य दर्शन घेऊन शकतात.
> –अर्चना नवले, पर्यटक

## रोगांमुळे नारळाचे उत्पादन घटले

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

भातपीकाच्या खालोखाल मुरुड तालुक्यातील शेकडो बागायतदार शेतकरी नारळ सुपारी पिकाचे उत्पन्न घेतात. मुरुड तालुक्यातील ७४ गावे व २४ ग्रामपंचायतींचे एकूण भौगोलिक क्षेत्र २६ हजार ५२५ हेक्टर असून यातील सुपारी ४१६ तर नारळाचे पीक ४३५ हेक्टरवर घेतले जाते. निसर्ग वादळात यापैकी ७७.४७ हेक्टर नारळ पिकाखालील क्षेत्र बाधीत झाले होते. हा मोठा फटका नारळ उत्पादक बागायतदार शेतकऱ्यांना बसला होता. या घटनेला चार वर्षांचा काळ लोटला असला तरी बागायतदार अजून त्या आर्थिक धक्क्यातून अद्याप सावरलेले नाहीत. यातच नारळाच्या झाडांवर व फळांवर पडत असलेल्या विविध रोगांमुळे हे पीक संकटात सापडले आहे.

सध्याच्या घडीला येथील बागायतीतील नारळाच्या झाडांवर पांढऱ्या अळीचा प्रादुर्भाव झालेला दिसून येत आहे. सुरवंटाच्या जातीच्या या आळ्या झापांची पाने गुंडाळून पानांचा फडशा पाडता आहेत. तर, पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावामुळे उभे नारळाचे झाड सुकून जाऊन बागायतदारांचे मोठे नुकसान करीत आहेत. या खेरीज नारळाच्या झाडांच्या शेंड्यात घुसून पोखरणाऱ्या भुंग्यांमुळे येथील



बागायतदार अक्षरशः त्रस्त झाला आहे. ऐन उत्पन्न देणाऱ्या माडाचा शेंडा कुरतडून खाऊन फस्त करणारे भुंगे उभे झाड मारून टाकत आहेत.

### व्हीपीडब्ल्यूए संस्थेचा पुढाकार

## खोपोलीतील भटक्या कुत्र्यांचे लसीकरण

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

**दरवर्षी प्रमाणे यंदाही खोपोलीतील भटक्या कुत्र्यांना अँटी रेबीज लस देण्याचे अभियान व्हेटर्नरी प्रॅक्टिशनर्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राहुल मुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, श्री कृपा एक्वेरियम, लायन्स क्लब ऑफ खोपोली, रोट्रॅक्ट क्लब ऑफ खोपोली आणि प्राणी मित्रांच्या माध्यमातून राबवण्यात आले. जवळपास पंधरा दिवस खोपोली शहरातील विवीध भागात हे अभियान राबविण्यात आले होते. यावेळी ७०० हून अधिक भटक्या कुत्र्यांना लस देण्यात आली.**

आंतरराष्ट्रीय रेबीज दिनाच्या निमित्ताने दरवर्षी लसीकरणाचे अभियान राबवले जाते. यंदाचे हे पाचवे वर्ष होते. मागील वर्षी जवळपास ५०० भटक्या कुत्र्यांना लस देण्यात आली होती. यंदा त्याहीपेक्षा जास्त संख्येने लसीकरण करण्याचा संकल्प



करण्यात आला होता. त्यानुसार यंदा या अभियानाचा शुभारंभ दि. ६ ऑक्टोबर रोजी करण्यात आला होता. या निमित्ताने खोपोली शहरातील भटक्या कुत्र्यांच्या दंशामुळे हबकलेल्या खोपोलीकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

या अभियानासाठी खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत कदम, खालापूर तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. काळे, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत, लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा शिल्पा मोदी, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेतर्फे गुरुनाथ साठेलकर आणि विजय भोसले यांच्यासह अनेक सदस्य तसेच शहरातील प्राणी मित्रांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. तसेच, श्री कृपा एक्वेरियमचे संचालक प्रवीण शेंद्रे यांनी या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली होती.

या मोहिमेसाठी हिमालया हेल्दी पेट फूड, ड्रुल्स पेट फूड, ऑरेंज पेट, कार्नीवेल पेट फूड, मिस्टिक इत्यादी कंपन्यांनी डॉग फूड पुरवले होते. तसेच, व्हेटर्नरी प्रॅक्टिशनर्स वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. राहुल मुळेकर, डॉ. विष्णू काळे, डॉ. प्रशांत बिराजदार, डॉ. आसाराम काळे, डॉ. शशिकांत थोरात व सागर कसबे यांनी प्रत्यक्ष योगदान दिले आहे.

## शिहूत बेकायदेशीर दारू विक्री

**। शिहू । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून रायगड जिल्हात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. एकीकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग जिल्हात अलर्ट मोडवर असून १५ ते २० ऑक्टोबर दरम्यान धडक कारवायांचा सपाटा लावला आहे.

यात अनेक जणावंर गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, पेण तालुक्यातील शिहू विभागात बेकायदेशीर गावठी दारू विक्री तेजीत असून आदर्श आचारसंहितेचे नियम फाट्यावर मारल्याचे चित्र पाहावयला मिळत आहे.

पेण तालुक्यातील शिहू विभागातील कुहीरे नजीक असलेली आयनावाडी, शिहू फाटा, गांधे, चोळे, आंबेराई, गांधे आदिवासीवाडी येथे सर्रास गावठी दारू विक्री केली जात आहे.

तसेच, बियर शॉपच्या नावाने चढ्या भावात मद्यविक्री केली जात आहे. दारूच्या आहारी जाणारी तरुणपिढी ही २५ ते ३० वयोगटातील असून याचा त्रास कुटुंबाला भोगावा लागत आहे. या दारू व्यवसायिकांवर कोणतीही कडक कारवाई होत नसल्याने नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# पाच कोटींचे रहस्य

सांगोल्याचे मतदार सध्या, काय गाडी, काय (पाच) कोटींचे डोंगर, काय पाटील, असे म्हणून कपाळाला हात लावत आहेत. गेल्या वेळी एकदा आपण एक चूक केली आणि आपल्या नशिबी हे काय आले असे तिला वाटत आहे. या जनतेने कित्येक दशके शेकापच्या गणपतराव देशमुखांना निवडून दिले. या काळात बहुतेकदा काँग्रेस सत्तेत होती. तरीही सांगोल्यातील जनतेने आपला बाणा बदलला नाही. सत्तेतल्या पक्षाचा आमदार निवडून दिला असता तर मतदारसंघाचा नाही, पण काही लोकांचा नक्कीच फायदा झाला असता. पण जनता आणि स्थानिक नेते असल्या आमिषाला बळी पडली नाही. गणपतराव जवळपास अखेरपर्यंत एसटीच्या गाडीने प्रवास करीत. त्यांचा शत्रूदेखील त्यांच्या चारित्र्याबद्दल बोट दाखवू शकणार नाही. दैवदुर्विलास असा की गेल्या निवडणुकीत मात्र सांगोल्याच्या जनतेने आपले वळण बदलले. शहाजीबापू पाटील नावाच्या तेव्हा अखंड शिवसेनेत असलेल्याची आम दार म्हणून वर्णी लागली. या नेत्याने गेल्या पाच वर्षात असे काही रंग दाखवले की, गेल्या पन्नास वर्षात जे घडले नाही ते गेल्या अवघ्या पाच वर्षात सांगोलेकरांना पाहायला मिळाले. शिवसेना फुटली त्यावेळी हे पाटील चुटकीसरशी उडून दुसऱ्या बाजूला गेले. ज्या गणपतरावांनी आयुष्यभर पक्ष आणि विचारसरणीबाबत आपली निष्ठा अभंग ठेवली त्यांच्या मतदारसंघातला हा आमदार दुसऱ्याच वर्षी पलटूराम झाला. सत्ताधारी पक्षात राहून याने मतदारसंघासाठी काय केले हा स्वतंत्रच विषय आहे. किंबहुना, हा काही विषयच नाही. कारण त्याने काहीच केले नाही. आणि, आता निवडणूक जाहीर झालेली असताना या आमदाराच्या जवळचे लोक पाच कोटी रुपयांची रोख रक्कम घेऊन पकडले गेले. ज्या गणपतरावांनी पै न पैचा हिशेब चोख ठेवला व सार्वजनिक चारित्र्य कटाक्षाने जपले त्यांच्या सांगोल्यातला लोकप्रतिनिधी असा निपजावा यापरते दुर्दैव ते कोणते? पुण्याजवळ खेड शिवापूर इथे पोलिसांच्या नाकाबंदीमध्ये अनपेक्षितपणे ही इनोव्हा कार सापडली.

### शहाजीबापूंचे कार्यकर्ते

पोलिसांना अर्थातच ही कार कोणाची वगैरे ठाऊक नसणार. अन्यथा ही कारवाई झालीच नसती. कारमध्ये सापडलेल्या पाच कोटींच्या करकरीत नोटांची बंडले पोलिस ठाण्याच्या आवारात ठेवून त्याचे व्हिडिओ शूटिंग करण्यात आले. त्यानंतर बहुदा नोटांच्या मालकाची कुणकुण लागली असावी. शहाजीबापू म्हणतायत की ही गाडी त्यांची नाही. पैसे त्यांचे नाहीत. बाळासाहेब आसबे नावाचा एक कंत्राटदार गाडीत होता. त्याचे हे पैसे असावेत. आमदारांचे म्हणणे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहे. पण ही गाडी सोलापूर जिल्ह्यातील आहे. सोलापूरकडेच निघाली होती. गाडीतील सर्वच माणसे शहाजीबापूंच्या निकटवर्तीयांपैकी आहेत. सागर पाटील हा त्यांचा कार्यकर्ता आहे म्हणतात. सर्वात महत्वाचे म्हणजे रफीक अहमद नजीर हा आमदारांचा दुसरा जवळचा कार्यकर्ताही या गाडीत होता. आमदार जेव्हा मुंबईतून पळून गुवाहाटीत गेले होते तेव्हा याच रफीक यांनी त्यांना त्यांची खुशाली विचारण्यासाठी फोन केला होता, जो नंतर सर्व महाराष्ट्रात गाजला होता. कारण, याच फोनवरच्या बोलण्यात बापूंनी काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेल असे प्रसिध्द उद्गार काढले होते. आता ही बातमी आल्यावर सांगोल्याच्या मतदारांच्या डोळ्यासमोर ते डोंगर चमकले. तेव्हा शिंदे गटात सामील झाल्याबद्दल भाजपने सर्व आमदारांना पन्नास खोके दिले अशी चर्चा होती. अशा गोष्टी कधीच सिध्द होत नसतात. आतादेखील निवडणूक लढण्यासाठी शिंदे यांनी आपल्या आमदारांना ५० ते ७५ कोटी रुपये दिले आहेत अशी अफवा आहे. काय वाटेल ते करून आपला आकडा भाजपच्या जवळपास नेऊन ठेवायचा हे एकनाथ शिंदे यांचे ध्येय आहे. त्यासाठी पाण्यासारखा पैसा वाहवला जात आहे असे म्हणतात. रायगडची जनता त्याचा प्रत्यय घेत आहेच. असो. मुद्दा असा की, खेड-शिवापूरला सापडलेल्या पाच कोटींविषयी पुढील कारवाई एकदम धीमी झाली आहे. ही रक्कम ट्रेझरीमध्ये जमा करण्यात आली आहे.

### काळेबेरे

पण ही रक्कम कोठून काढण्यात आली व कोठे चालली होती याचा जाहीर खुलासा होणार का हा खरा सवाल आहे. निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर बँकांमधून एका वेळी खूप मोठ्या रकमा काढण्यावर बंधने येतात. अशा रकमांची यादी ठेवून त्याचा रिपोर्ट जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना रोजच्या रोज द्यावा लागतो. खेडजवळ सापडलेल्या रकमेचा असा हिशेब संबंधित बँकेने दिला होता का ही माहिती एका मिनिटात मिळू शकते. ही रक्कम खरोखरच वैध असेल तर तसे जाहीर करता येऊ शकेल. पण कारवाई होऊन चाळीस तास लोटल्यावरही ही माहिती जाहीर झालेली नाही. याचा अर्थ यात काहीतरी काळेबेरे आहे व प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही रक्कम कंत्राटदाराची असेल तर त्याची कोणती कामे कोठे चालू आहेत हेही कळायला हवे. शिवाय इतक्या रकमेचे व्यवहार बँकेऐवजी तो रोख स्वरुपात का करतो हेही मोदींच्या डिजिटल इंडियाला कळायला हवे. खेड शिवापूरवरून दर तासाला हजारो गाड्या ये-जा करीत असतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी तीन वाजल्यापासून पाळत ठेवण्यात आली होती व संध्याकाळी सहा वाजता कारवाई करण्यात आली. याचा अर्थ पोलिसांना खात्रीशीर टीप मिळालेली होती. मग आता पुढच्या कारवाईला विलंब का होत आहे याचे उत्तर मिळायला हवा. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व शहाजीबापूंचे नेते एकनाथ शिंदे यांचा पोलिस व स्थानिक प्रशासनावर काही दबाव आला का हे कळायला हवे. निवडणुकीतील सध्याचे वातावरण सरकारच्या विरोधात आहे. भाजपच्या जागा कमी होणार हे सर्वच जण मान्य करतात. सीएसडीए या दिल्लीच्या प्रतिष्ठित संस्थेचे जे ताजे सर्वेक्षण आले आहे त्यात बेकारी, महागाई, भ्रष्टाचार या मुद्द्यांवर जनता महायुतीवर नाराज असल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. या स्थितीत युतीकडून पैशांचा पाऊस पाडला जाईल अशी भीती सर्वांना वाटते आहे. खेड शिवापूरचे पाच कोटी ही त्याची नुसती चुणूक म्हणायला हवी.

विचार

# प्रवास पुणे पेढांबे- सिद्धाश्रम

ॲड. आदिती वैद्य

गेल्या आठवड्यात कार्लेखिंड ते स्वारगेट 'शिवशाही' ए.सी. बसने सुखाचा प्रवास करण्याचा सुयोग आला. सुनबाईने ऑनलाईन बुकिंग केले. माझ्या फोनवर चक्क तिकीट आले. सर्वात आनंद म्हणजे ९ नंबरची खिडकीजवळची सीट मिळावी. साडेचार तासात मी चक्क, सारसनगर सिद्धीविनायक सोसायटी वरच्या मजल्यावरच्या ६ नंबरच्या फ्लॅटमध्ये जाऊन पोहोचले. खरं म्हणजे ८३ व्या वर्षी मी एस.टी.ने. प्रवास करणे ५० पायऱ्या चढणे, घरी पोचणे सगळेच स्वप्नवत वाटत होते. खरा आनंद झाला कारण माझ्या वयामुळे एस.टी.च्या प्रवासाचे तिकीटही काढावे लागले नाही. फुकट, फुकट, चकटफू ही खरी गंमत.

या अनुभवातून गेल्यामुळे लहानपणापासून पेढांब्याचे सिद्धाश्रमचे केलेले प्रवास आठवले. शनिपाराजवळ मुळे बस सर्व्हिसची बस, ८६४ सदाशिव पेठेतल्या, घराच्या पुढच्या पत्र्यापाशी येऊन उभी राहायची. त्या पत्र्यावरूनच बसच्या पत्र्यावर सर्व सामान चढवले जायचे. पेढांब्यास तेव्हा एकही दुकानच नव्हते. धान्यापासून, पोती घेऊन जावे लागायचे. ती बस धरमतरच्या खाडीपर्यंत जायची. सर्व सामान बोटीत चढवावे लागे. पलिकडे २ बैलगाड्या घरून बोलावलेल्या असायच्या. एका गाडीत माणसं बसायची. दुसऱ्या गाडीत सामान भरायचं. बैलगाडीतून धरमतर ते पेढांबे असा प्रवास करत असू. १९४६ ते ४८ सालापर्यंत असाच प्रवास करत होतो. प्रत्येक मे महिन्याच्या सुट्टीत पेढांबे ठरलेला प्रवास. इलेक्ट्रिसिटी नव्हती.

१९४८ साली शेवटी लेट गाडी आली. पुणे ते धरमतर प्रवास गाडीतून सुरू झाला. पण 'अडीचकी' म्हणून धरमतरला समुद्राची खाडी ओलांडण्यासाठी भरती केव्हा असेल याचे गणित मॅट्रिकला पहिल्या आलेल्या मैत्रेयी विनोद पटकन करायच्या. किती वाजता धरमतरला पोचलं पाहिजे गवताच्या मांडवात सारवलेल्या जमिनीवर सतरंजी लावून सर्वजण एकाच सतरंजीवर झोपत असू. दिवसभर पडीचे आंबे गोळा करायचे. आंब्याचं कोयाडं बनत असे. भात आणि कोयाडं असा मेनू असे. सर्वजण ओरपून ओरपून जेवत. पाडाचे आंबे खाणे आणि भाटात जाऊन करवंद खाणे असा रोजचा कार्यक्रम असे. आत्याबाईंची एक मुलगी सोनूताई बाम अलिबागला असे. तिची मुलं कमळ, शरद, विजू, उषा, सुरेश पेढांब्याला येत. आम्ही अलिबागला तिच्याकडे जात असू. तात्या मामांची मुलं आनंद, मुकुंदा, राजन हे पण हजर असत. आते मामे, मावस भावंडांचं संमेलनच असे. आत्याबाईंची शांताताई नेने, कुमुदिनी नेने दरवर्षी पेढांब्याला येत. या संमेलनामुळे आम्ही सर्वजण पेढांब्याशी बांधले गेलो. आत्याबाईंच्या गोदुताई आणि गंगुमाई नेहमी मुंबईत दादरला अहमद सेलर बिल्डींगमध्ये राहत. पण मे महिन्यात सर्वांचा मुक्काम पेढांब्याला असे. सर्व अडचणींना सहज तोंड दिले जाई. जेवणाखाण्याचे लाड कुणाचेच होत नसत. आंब्याच्या झाडावर चढायचे आंब्याच्या आढ्या लावायच्या. आंब्याची साठी ताटात वाळवायची. मांडवातला खेळ म्हणजे खांब-खांब खांबोली. मोठी माणसे पण खेळायची. धमाल यायची. सर्व जण मोठे झाले. कामात गुंतले. पण सर्वजण आठवणीत सुखावतात. पेढांब्यात जेवणाचे पदार्थ पहिला भात, मधला भात, शेवटी पुन्हा भात. भाताशी 'कोयाडं' नावाचा एक पदार्थ असायचा. पडलेल्या रायवळ आंब्याचा तो पदार्थ त्यात आंब्याच्या कोयी असत. सालांचा रस आतच पिळलेला असे. त्या कोयी फोडणीला टाकायच्या. त्यात तिखट, मीठ, गूळ घालून एक चविष्ट तोंडी लावणं होत असे. मोठी पातेली भरून कोयाडं केलेले असे. इतर पदार्थ नसत. पण त्याची आठवणही कुणालाच होत नसे. मांडवात जमिनीवर पत्रावळी टाकायच्या. सतरंज्या टाकायच्या. 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे' श्लोक म्हणून जेवणारा सुरूवात पंक्ती बसत. हे ठरलं की पुण्याहून जुन्या घाटातून मुंबई मार्गावरून खोपोली-पेण-धरमतर असा प्रवास सुरू व्हायचा. भरतीचं गणित जमलं तर वेळेत वेळेत धरमतरला पोचायचो. पेणला पेंडसे काकांचे घरी मुक्काम करावा लागत नसे. खाडीतून पलिकडे जायला बोटी असत.



माणसं बोटीतूनच धरमतरची खाडी पार करत. शेवटी लेट गाडी मात्र तराफ्यावर चढवावी लागे. दोन लाकडी ओंडक्यांवरून गाडीची चाके पलिकडे नेण्याचं अवघड काम आमची आई अगदी योग्य शिताफीने करत असे. दिगुतात्या बिचकत असे. गाडीत माणसे भरपूर असत. दिगूतात्या ड्रायव्हिंग सीटवर असे. स्वयंपाकासाठी मामी काळे आणि त्यांची दोन मुलं कुंदा, रमेश असे तिघेजण. पुढच्या सीटवर बसत. मागच्या सीटवर अप्पा वहिनी, आत्याबाई बसत. मध्ये दोन मोठी बेडिंग्ज ठेवलेली असत. त्यावर आम्ही भावंडे दादा, उदय मी छबी बंड्या बसत असू. छमीच्या (संहितांच्या) जन्मानंतर शेवरोलेट गाडी आली. नंतर मात्र धरमतरचा पूल तयार झाला. पेणला न जाता रेवसवरून धरमतरच्या पुलावरून कार्लेखिंडीतून खडीच्या रस्त्यावरून पेढांब्याला सिद्धाश्रमात जाणे शक्य होऊ लागले. या खडीच्या रस्त्यावरून गाडीने जाणे ही पण कसरतच असे.

ड्रायव्हरच्या स्किलची परीक्षाच असे. त्या ५ किमी अंतराला अर्धा पाऊण तास वेळ लागत असे. पण बसने, बोटीने, बैलगाडीने पोचायला १०/१२ तास लागत ते ५/६ तासात पोचणं शक्य व्हायला लागलं. कितीही अडचणीचा रस्ता असला तरी वहिनी प्रत्येक मे महिन्यात सर्वांनी घेऊन पेढांब्याला जात असे. कधी कंटाळत नसे. अहमदनगरला ती डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणून कामात होती. पण आम्ही सर्व जण पेढांब्याला पोचलो नाशिकला ट्रेनिंग कॉलेज फॉर विमेनची प्रिन्सिपल होती. मला आठवतं वहिनीने नाशिकहून मला मुंबईला पाठवले. बरोबर छमी, बंड्या आणि अण्णा असे होते. मी जेमतेम दहावीत होते. पण सर्वांना घेऊन मी मुंबई रेल्वे स्टेशनवरून समुद्रावर जाऊन भाऊचा धक्का नंतर बोटीने पेढांब्याला खरा गेले होते. वहिनी धाडसी आणि मी पण तिचीच मुलगी! आता वाटते ते सोपे नव्हते !

प्रत्येक चंद्रग्रहणाला आणि सूर्यग्रहणाला अप्पा पेढांब्यात जात. प्रत्येक ग्रहणाचे वेळी विहिरीवर आंघोळ करून एक पुजाविधी करत असत. आश्रमाचे बाहेर त्यांनी होमकुंड बांधले होते. त्या कुंडात अग्नि प्रज्वलित करून अप्पा त्यांच्या तांब्याच्या तारा, तांब्याचे पत्रे, समिधा, बिब्बे, सागरगोटे, कवड्या अभिमंत्रित करीत असत. ग्रहण काळात चंद्राची सूर्याची शक्ती, पॉवर हजार पटींनी वाढलेली असते. या सर्व वस्तूंवर मंत्राचा प्रभाव पडतो. त्या सर्व शक्ती आत्मसात करतात. अभिमंत्रित होतात. त्यांनी ग्रहण काळात ही शक्ती हजार पटींनी उद्दीपीत करतात. त्यामुळे या अभिमंत्रित वस्तु माणसाच्या अडचणींवर मात करू शकतात. शारीरिक, मानसिक, व्यवसायातील अडचणींवर मार्ग काढतात. अर्थात या वस्तूचा वापर कसा करावा ते अप्पांच्या ठिकाणी असलेली दैवी शक्ती. त्यांना वापरण्यास मार्गदर्शन करत असे.

ग्रहणाचे दिवशी आप्पांचे प्रवचन ऐकण्यास हजारोंनी माणसं येत. शिवाय मंत्र जपाचे महत्व असे. एकदा केलेला जप हजार वेळा जप केल्याचे पुण्य देतो. या अप्पांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे सर्वजण आवर्जून जप करण्यासाठी येत.

१९८८ साली मी स्वतः मारूती ८०० एमएच-१६२ ही माझी घेऊन अनेकदा सिद्धाश्रमात येऊ लागले. नंतर फियाट गाडी घेतली. घाट जुना होता. पण सगळी वळण पाठ होती. भीती कशाचीच वाटत नसे. गाडीत पेट्रोल असलं की गाडी चालते. नीट चालवणं ड्रायव्हरचं काम. आई (वहिनी) गाडी चालवे. त्यामुळे ड्रायव्हिंग म्हणजे फार काही करतो असे कधी वाटत नव्हते.

धर्मा पोसू मोकल या सिद्धाश्रमात राहणाऱ्या गड्याने विनोद कुटुंबियांच्या जमिनीला कूळ म्हणून नाव लावण्याचा खटाटोप केला. त्याला हाकलून काढण्यापासून वकील म्हणून, मुलगी म्हणून वारंवार पेढांबे-सिद्धाश्रम केतकीचा मळा येथे वरचेवर यावे लागत होते. मी गाडी घेऊनच येत असे. काही वेळा एकटी पण येत असे. पद्मनाभ सिद्धाश्रमात एकटा राहत असे. अर्थात गावातल्या मुलांबरोबर त्याने चांगली दोस्ती वाढवली. तो असल्यामुळे तहसीलदारांची मीटिंग यशस्वी झाली. गावातील दीडशे मंडळी जमली. त्यांनी सर्वांनी धर्मा पोसू मोकल हा'घरगडी' आहे आणि'कूळ' नाही हे एकमुखाने सांगितले. त्याच्याबरोबर ते सर्व दावे, अपिले निकाली होईपर्यंत १२ वर्षे लढा चालला. प्रत्येक तारखेला अगदी मुंबई हायकोर्टापर्यंत हजर राहावे लागत होते. अलिबाग कोर्टातील सर्व कामकाज चालवणे भाग पडले मी गाडी घेऊन अलिबागला येत होते. मला बघायला भेटायला मुद्दाम माणसे येत असत. हाही एकटीने प्रवासाचा अनुभव खूप सामर्थ्य देणारा होता. एक्सप्रेस वे मुळे गेली १०/१२ वर्षे गाडी चालवणे सुखाचे झाले आहे.

आजकाल

# सिस्टिमने तुम्हाला नफ्याच्या रक्ताची चव लावली...

संजीव चांदोरकर

जुगाराचा अड्डा चालवणाऱ्या बुकीचे उत्पन्न किती जुगारी जुगारात भाग घेतात यावर ठरते. कोणीही जिंकू दे, कुणीही हरू दे. यात बुकीला काडीचाही रस नसतो. कारण खेळणाऱ्या प्रत्येकाकडून तो फी वसूल करतो. नंबर आणि व्होल्युम वाढला पाहिजे. बस्स..

समजा काही कारणांमुळे हरणारी लोकं पैसे संपल्यामुळे टेबल वरून उठून जाऊ लागली, तर अर्थात बुकींचे फीचे उत्पन्न कमी होणार असते.

मग बुकी त्यांना म्हणतो : "आता पैसे हरला आहात पण टेबल वरुन उठूनच गेलात तर त्या पैशावर कायमचे पाणी सोडावे लागेल. टेबलवर बसून खेळत राहिलात तर जिंकू देखील शकता आणि हरलेले पैसे रिकव्हर करू शकता" बुकी हरणाऱ्याच् जुगाऱ्याच्या मनातील बोलत असतो.

असे म्हणून बुकी त्यांना व्याजाने कर्जाऊ पैसे देऊ करतो. जुगारी ते कर्ज घेतो. पुन्हा टेबलवर बसतो

जुगाराचे व्यसन लागलेली व्यक्ती जुगाराच्या अड्ड्याच्या बाहेर पडली तर वेड लागलेल्या माणसासारखी भिरभिर फिरत राहील. जुगारी बनल्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे ती व्यक्ती २४ फक्त, अगदी झोपेत देखील, जुगाराचा विचार करू लागते.

वित्त निरक्षर गुंतवणूकदारांच्या आपल्या देशात फ्युचर आणि ऑप्शन्स सेगमेंट मध्ये होणाऱ्या व्यवहारांची संख्या जगात पहिल्या क्रमांकावर आहेत.

सेबीच्या हवालानुसार ह्या सेगमेंटमध्ये खेळणाऱ्या ९३ टक्के व्यक्तीनी गेल्या चार वर्षात २



लाख कोटी रुपये हरले आहेत. नफा कमवणाऱ्यांचे प्रमाण फक्त ७ टक्के आहे.

हे लक्षात आल्यावर सेबीने फ्युचर आणि ऑप्शन सेगमेंट मध्ये खेळणाऱ्यांवर प्रचंड निर्बंध आणले. त्यामुळे या सेगमेंट मधील व्यवहार ४० टक्यानी कमी होतील अशी अपेक्षा आहे.

याची धडकी भरली ब्रोकर्स ना. कारण वर म्हटल्याप्रमाणे कोण नफा कमवते व कोण तोटा याच्याशी ब्रोकर्सना काही देणे घेणे नाही. लाखो कोटी रुपयांचे व्यवहार वाढते राहिल्यावरच त्यांना अधिकाधिक फी चे उत्पन्न होत असते.

त्यावर मात करण्यासाठी ब्रोकर्सनी कॅश सेगमेंटसाठी "मार्जिन ट्रेडिंग फंडिंग" सुरू केले आहे.

या योजनेत गुंतवणूकदाराला एक लाख रुपयांचे शेअर्स विकत घ्यायचे असतील तर त्याच्या जवळ सगळे पैसे असायची गरज नाही. त्याने २५,००० आणले तर ब्रोकर ७५,००० रूपये त्याला कर्जाऊ देऊ लागला आहे. अर्थात व्याज आकारून. ८ ते १० टक्के व्याजाचा दर आहे. असे खरेदी केलेले शेयर अर्थात ब्रोकर कडे गिरवी ठेवावे लागतात.

यात परकीय आणि देशी ब्रोकरेज हाऊसेस उतरत आहेत.

फक्त दोन तीन महिन्यात ची सुविधा वापरून शेअर्स खरेदी खरेदी करणाऱ्यांची संख्या आणि व्यवहार ५० टक्यांनी वाढले आहेत.

भारतातील वित्त भांडवलाने आणि आयुष्यात पहिल्यांदा स्टॉक मार्केट मध्ये उतरलेल्यानी नफ्याचे "रक्त" चाखले आहे. त्याच्यावर कितीही निर्बंध आणले तरी ते वेगवेगळे मार्ग शोधून काढून रिझर्व बँक सीबी सारखे नियमक मंडळांना चितपट करणार आहे. नफ्याचे रक्त शोधत फिरणार.

मग ते फ्युचर अँड ऑप्शन्स सेगमेंट असू दे, विमा क्षेत्र असुदे, गोल्ड लोन असुदे, मायक्रो लोन असुदे किंवा डिजिटल लेंडींग..

वाईट गोष्ट हि आहे कि वित्त निरक्षर , वित्त क्षेत्रातील क्लिष्ट संकल्पना आणि त्याचे अर्थ माहित नसणारे , फक्त टिप्स वर गुंतवणुकीचे निर्णय घेणारे , जोखीम क्षमता कमी असणारे यात बहुसंख्यने आहेत

त्यांना आता स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची मुभा नाही. ब्रोकर, स्टॉक मार्केट, कर्ज देणाऱ्या वित्त संस्था, भांडवली बाजारातील सल्लागार , इन्फ्लुएन्सर्स, मीडिया यांची उत्पन्ने ते टेबलवर बसणार कि उठून जाणार यावर अवलंबून आहेत.

तरुणांनो, यात अंबानी, अदानी कोठेही नाही. म्हणून सिस्टिम समजून घ्या.

## लोकसंसद

### भाषेचं सौंदर्य जपता येईल का?

आजच्या तरुणाईचा एक संवाद ऐकायला मिळतो: "अरे, तू किती कूल दिसतोय रे! यार, हे टीशर्ट खूप ऑसम आहे!"

हे ऐकल्यावर वाटतं, ह्याचं मराठी कुठे गायब झालं? आपल्याकडे मराठी भाषा आहे की इंग्रजीचा थोडासा अनुवाद!

आपल्या अभिजात मराठी भाषेचं काय झालं? ती शब्दांची ताकद, ती गोडी आणि ती स्वाभाविकता कुठे हरवली? इंग्रजी शब्दांची भर घालून संवाद साधणं म्हणजे काहीतरी 'फॅन्सी' झालंय. "कुल" हे नवीन आहे, "छान" आता कुठे वापरायचं? पूर्वी ज्या भाषेत आपले संत ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांनी आत्मिक विचार व्यक्त केले, त्याच भाषेत आता "कॉफीचं ऑर्डर कर" असं का ऐकायला मिळतंय?

तरुणाईला असं वाटतं की मराठीत बोललं तर 'मॉडर्न' दिसत नाही, आणि म्हणूनच प्रत्येक वाक्यात इंग्रजीची हळदीची मिरची लागते. एकेकाळी आपली मराठी ही ज्ञान आणि तत्वज्ञानाची भाषा होती. आता ती "ड्यूड" आणि "कूल" एवढीच उरली आहे. काहींना विचाराल, "तू मराठीत का बोलत नाहीस?" तर ते उत्तर देतील, "ते लँग्वेज फार गावंढळ वाटतं." गावंढळ? तीच भाषा ज्यात आपल्याला संवाद साधायला शिकवलं, तीच भाषा जी आपली ओळख आहे?

इंग्रजी शिकावं यात काहीच चूक नाही. पण अभिजात मराठी बोलताना इंग्रजी शब्दांच्या तुकड्यांची भर घालणं म्हणजे आपल्या भाषेचा अपमान नाही का? परंतु हल्लीच्या तरुणाईला ते काही विशेषसं वाटत नाही. त्यांचं एकच वाक्य, "चिल्ल मार, काही फरक पडत नाही!" फरक पडतो, पण समजायला वेळ लागतो. आता सोशल मीडियावर पाहा. मराठीत पोस्ट लिहायच्या असल्या तरी त्यात असतील तर इंग्रजी हॅशटॅग आणि "इमोजी". "आजचा दिवस खूप छान होता" असं लिहिलं की लोक विचारतील, "काय रे, एवढं साधं का?"'साधेपणाची चेष्टा करायची, कारण आज 'स्टायलिश' दिसणं महत्त्वाचं झालं आहे. आता या लेखातून तरुणाईला उपदेश द्यायचा प्रयत्न केला तर एकच उत्तर मिळणार: "रिलॅक्स यार, इतकं सिरियस घेऊ नकोस." पण गंभीर होण्याची वेळ आली आहे. भाषेची श्रीमंती टिकवायची असेल, तर तिचा योग्य वापर करायला हवा. इंग्रजी यायला हवं, पण आपल्या मराठीची ओळख नष्ट होऊ द्यायची नाही. म्हणून तरुणाईने विचार करायला हवा. भाषा फक्त संवादाचं साधन नाही; ती आपली ओळख आहे, आपल्या संस्कृतीची मूळ जाण आहे. 'कूल' दिसणं ठीक आहे, पण त्यात आपल्या भाषेचं सौंदर्य गमवायला नको. "रॉक ऑन" म्हटलं तरी ठीक, पण आपल्या मराठीला "रॉक" करायला विसरू नका! **- भावेश जनार्दन म्हसकर, नेरुळ**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ ऑक्टोबर**

**१८६८ :-** औंध संस्थानचे अधिपती, चित्रकार, कीर्तनकार तसेच व्यायामविषयक पुस्तकांचे कर्ते भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी यांचा जन्म. 'कीर्तनसमनहार' या पुस्तकात त्यांनी १४ पौरोणिक व १४ ऐतिहासिक आख्याने संग्रहित केली. सचित्र आहार, चिकित्साशिक्षक, सचित्र नेत्रबल संवर्धन आदी पुस्तकेही त्यांनी लिहिली होती. चित्रकार असणाऱ्या भवानरावांनी चित्रकलेवरही ग्रंथ रचलेत. 'अजंठा' (लेण्यातील षिल्पकला व रंगीत चित्रे), 'वेरुळ' (सचित्र, चित्र व षिल्प याविषयी माहिती, स्थलवर्णन व प्रवासवर्णन) तसेच चित्ररामायण, महाभारत, भवानीसहस्त्रनाम हे त्यांचे सचित्र ग्रंथ प्रकाषित झाले आहेत. याषिवाय 'शूर शिपाई' ही सामाजिक कादंबरीही त्यांच्या नावावर आहे. **१८९०:-** वैद्यकीय ग्रंथांचे लेखक व निष्णात शल्यचिकित्सक (सर्जन) डॉ. गोपाल षिवराम लागवणकर यांचे निधन. मराठीत 'शस्त्रवैद्यक' आणि 'न्यायवैद्यक' ही पुस्तके त्यांनी लिहिली, तसेच 'दंभहारक' या टोपणनावाने अनेक लेख लिहिले. **१८९८:-** 'हिंदुस्थानचा सांपिक इतिहास' तसेच अन्य महाविद्यालयीन पुस्तकांचे कर्ते रामचंद्र विनायक ओतुरकर यांचा जन्म. **१९२३:-**लेखक गोपाळ महादेव किराणे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत गांधीजीच्या जीवनावर 'असे होते बापू', कुमारांसाठी 'लाल बहादूर शास्त्री' आणि भारत चीन यांच्यात झालेल्या १९६२ च्या 'युध्दातील वीर जवानांच्या कथा' हे 'व्यर्थ न हो बलिदान' या पुस्तकातून साकारल्या आहेत. **१९३४ :-** लेखिका शोभा शरच्चंद्र बुचे यांचा जन्म. 'मराठीतील ज्ञानकोष' आणि 'ज्ञानकोष रचनाषास्त्र' हा त्यांचा प्रबंध पुस्तक रुपात प्रसिध्द. यातून मराठी साहित्यातील कोषकारांच्या कर्तृत्वाची नोंद लेखिकेने घेतली जाते. याषिवाय विविध वृत्तपत्रातून ग्रंथ समीक्षण, मासिकातून कथालेखन तसेच ललित विषयांवरही त्यांचे विपूल प्रमाणात लेखन प्रसिध्द. **१९३५:-** साहित्यिक श्री. द. तु. नंदापुरे गुरुजी यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'सुगीता (भगवद्गीतेचा सुगम पद्यानुवादासह), 'सार्थ श्रीरामगीता','सार्थ पांडवगीता', 'सार्थ श्रीगुरुगीता','मी नाथाचा भटजी तेली' (विनोदी एकांकिका) तसेच बाळबोध कविता आणि नव्या कहाण्या हे प्रौढ साक्षरांसाठी याषिवाय 'महात्मा गांधी बोध गीता','ईश्वराच्या शोधात' हे (स्वामी विवेकानंदाच्या इंग्रजी कवितांचा मराठी पद्यानुवाद), 'तुलसी रामायणान्तर्गतः सुन्दरकाण्ड (मराठी ओवीबध्द अनुवाद), 'श्रीरामचरित मानस' मराठी ओवीबध्द अनुवादासह त्यांनी अनेक मासिके व दैनिकांमधून शैक्षणिक, ललित आणि अध्यात्मपर लिखाण प्रसिध्द. **१९४३:-** कवी विष्णू चोपकर यांचा जन्म. ह्यांचा 'मातृगीता' हा काव्यसंग्रह प्रकाषित झाला आहे. **१९७७:-** लेखक दिनेष हरीभाऊ काळे यांचा जन्म. 'छंद आणि विज्ञान','गोष्ट बहुगुणी पाळीव प्राण्यांची','गोष्ट स्वातंत्र्य लढयाची','गोष्ट मुक्या पाखरांची','गाथा थोर समाजसुधारकांची' इ. पुस्तके प्रसिध्द. **२००९:-** कवी भास्कर हिरामण मेश्राम यांचा जन्म. 'ओजस सिध्दांत','पथ प्रबोधी' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# संदीप नाईक यांनी हाती घेतली तुतारी

## ■ बेलापूरमध्ये मंदा म्हात्रे यांना तगडे आव्हान

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजपचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांचे सुपुत्र संदीप नाईक यांनी मंगळवारी शरद पवार गटात प्रवेश केला. संदीप नाईक हे बेलापूर मतदारसंघातून लढण्यासाठी इच्छूक होते. मात्र, भाजप नेतृत्वाने मंदा म्हात्रे यांना संधी दिल्याने संदीप नाईक यांनी जयंत पाटील यांच्या उपस्थितीत वाशी येथील निर्धार मेळाव्यात तुतारी हाती घेतली. यावेळी संदीप नाईक यांच्यासोबत बेलापूर विधानसभा क्षेत्रातील २५ माजी नगरसेवक, माजी महापौर, माजी उपमहापौर आणि अनेक पदाधिकाऱ्यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. संदीप नाईक यांनी अख्खी भाजपा खाली केल्याने बेलापूरमध्ये मंदा म्हात्रे यांच्यासमोर तगडे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.



निर्धार मेळाव्यात शरद पवार गटात प्रवेश केल्यानंतर संदीप नाईक यांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करुन दिली. शरद पवार, सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा सोबत काम करण्याची संधी दिली. याबाबत मी आभार व्यक्त करतो. २०१९ मध्ये काही कारणास्तव आम्हाला निर्णय घ्यावा लागला. नवी मुंबईच्या हितासाठी आम्हाला निर्णय घ्यावा लागला. काही प्रश्न सत्तेशिवाय मार्गी लागत नाहीत. आम्ही लढलो आणि जिंकून आलो, पण नंतर जे यश आमचे नसून पक्षाचे नसून एकट्या माझे आहे, असे सांगितले गेले. त्यावेळी कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला. त्यावेळी आम्हाला दिलेला शब्द, नंतर फिरवला गेला, माझी कोंडी झाली. पण माझ्या शहराची कोंडी झाली नाही पाहिजे. त्यावेळी मी थांबलो, माझ्यासमवेत जे आले त्यांची कामे होतील, यासाठी आम्ही येथे आलो आहोत, असे संदीप नाईक यांनी सांगितले.

### भाजपच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा

**संदीप नाईक यांनी शरद पवार गटात प्रवेश करण्यापूर्वी भाजपला सोडचिठ्ठी दिली. संदीप नाईक यांनी भारतीय जनता पक्षाचा राजीनामा बावनकुळे यांच्याकडे पाठवला होता. संदीप नाईक नवी मुंबई भाजपाचे जिल्हाध्यक्ष होते. त्यांनी जिल्हाध्यक्ष आणि पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. संदीप नाईक यांच्या शरद पवार गटात जाण्याने नवी मुंबईत भाजपला मोठे खिंडार पडल्याची चर्चा आहे. संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक यांना भाजपने ऐरोली विधानसभेची उमेदवारी दिली आहे. त्यांनी यापूर्वी आपण मुलगा संदीपचा प्रचार करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.**

# संगमेश्वर महामार्ग बनला धोकादायक

**संगमेश्वर :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर तालुक्यातील आरवली ते बावनदी अपघातप्रवण क्षेत्रातील चौपदरीकरणाचे काम रखडले आहे. चौपदरीकरणाचे काम करत असताना कोणतीही सुरक्षा घेतली जात नसल्याने महामार्ग धोकादायक बनला आहे तसेच या अपघातप्रवण क्षेत्रात वाहनांचे अपघातही घडत असून प्रवासी जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक ठिकाणी मोऱ्या आणि इतर बांधकामांचे काम रखडले आहे. धोकादायक ठिकाणी मोठे खड्डे काढून काम अर्धवट सोडले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहनांचे मोठे अपघात घडत आहेत. चौपदरीकरणाचे काम करत असताना महामार्गावर धावणाऱ्या वाहनांची सुरक्षा घेणे आवश्यक असते; मात्र ठेकेदार कंपनीकडून अशा कोणत्या प्रकारची यंत्रणा उभी केली जात नसल्याने महामार्ग धोकादायक बनला आहे. चौपदरीकरणाचे काम करत असताना राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांची देखरेख असणे आवश्यक असते; मात्र अशी देखरेख या ठिकाणी होत नसल्याने चौपदरीकरणाला कोणी वाली नसल्याचे चित्र संगमेश्वर तालुक्यात दिसून येत आहे.

## एसटीत सवलत द्या

**पावस :** महाराष्ट्र शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटीने प्रवास मोफत केला आहे; मात्र या वयोगटातील प्रवाशांची संख्या कमी आहे. शारीरिक अडचणींमुळे ज्येष्ठ नागरिकांना बसमध्ये चढणे, उतरणे कठीण जाते. तसेच त्यांना एसटीने प्रवास करण्यास कुटुंबही नकार देतात. त्यामुळे ६५ वर्षांपासून वयोगटांतील ज्येष्ठ नागरिकांनाही मोफत प्रवासाचा लाभ मिळावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे पावस विभाग अध्यक्ष संतोष पोकडे यांनी केली आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी प्रवास करता येत नाही.

# बेकायदा होणारी दारू वाहतूक रोखा

## ■ बांद्यात पोलीस प्रशासनाला निवेदन

**। बांदा । वृत्तसंस्था ।**

बांद्यात घडलेल्या 'हिट अँड रन' प्रकरणातील संशयिताचा लवकरात लवकर शोध घेण्यात यावा, तसेच सीमेवर गाळेल गावातून राजरोसपणे होणाऱ्या बेकायदा दारू वाहतुकीवर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने शहरप्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य साई काणेकर यांच्या नेतृत्वाखाली बांदा पोलिस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक खंडागळे यांची भेट घेत निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, बांदा शहरात भरधाव वेगात वाहने चालविण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे स्थानिकांच्या तसेच पादचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. दोन दिवसांपूर्वी घडलेल्या घटनेतील संशयित अद्यापही मोकाट असून, पोलिसांनी त्याचा लवकरात लवकर शोध घ्यावा. सिंधुदुर्ग-गोवा सीमेवर गाळेल येथून मोठ्या प्रमाणात बेकायदा दारू महाराष्ट्र राज्यात येते.

याला आळा घालण्यासाठी पोलिसांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी. अवैध दारू वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. बांदेश्वर मंदिर चौकातील सीसीटीव्ही बंद असून, ते लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी साई काणेकर, ओंकार नाडकर्णी, बिपीन येडवे, अनिल नाटेकर, राजदीप पावसकर, धनेश नाटेकर, अजय महाजन, ज्ञानेश्वर येडवे, भाऊ वाळके आदी उपस्थित होते. पोलिस निरीक्षक खंडागळे व पोलिस उपनिरीक्षक शिवराज झांजुर्णे यांच्याशी पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली.

# उरण पोस्ट कार्यालय धोकादायक इमारतीत

**। उरण । वार्ताहर ।**

उरण नगरपालिकेने धोकादायक इमारती जाहीर केल्या आहेत. पैकी शहरातील इमारतीमध्ये पोस्टाचे कार्यालय सुरू आहे. त्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोस्ट कार्यालयाचे लवकरात लवकर स्थलांतर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सदर इमारत नगरपालिकेने धोकादायक इमारत दिल्याने कर्मचारी वर्ग जीवावर उदार होऊन काम करीत आहे.

इमारतीमधील काही ठिकाणचा भाग अचानक कोसळत आहे. पोस्ट कार्यालय उघडल्यानंतर जनतेची गर्दी होते, विशेषतः लाडकी बहीण योजनेमुळे महिलांची जास्त गर्दी दिसते. पोस्टाचे दर कमी असल्याने मनिऑर्डर, रजिस्टर पोस्ट, स्पीड पोस्ट, बचत खाता, साधारण पोस्टसाठी जनतेचा ओढा वाढत चालला आहे.

उरण शहरात गिरीराज सोसायटीच्या इमारतीत पोस्ट कार्यालय कार्यरत आहे. सदर इमारत धोकादायक झाली असल्याने नगरपालिकेने तसे जाहीर करून सोसायटीला लेखी पत्र देऊन त्वरित खाली करण्यास सांगितले आहे.

सोसायटीने त्वरित या पत्राची दखल घेऊन कार्यवाहीस सुरवात केली. त्याआधी इमारतीमधील काही भागांना चिरा गेल्या आहेत, तर काही ठिकाणचा स्लॅब पडला आहे. यामुळे सोसायटीमधील बहुतांश सदनिका धारकांनी सदनिका खाली केल्या आहेत. दोन तीन महिन्यापासून पाठपुरावा सुरू असूनही पोस्ट कार्यालय स्थलांतरित न झाल्याने पोस्ट कार्यालयातील कर्मचारी व ग्राहक

जीव मुठीत धरून येत असतात. याची दखल न घेतल्याने भविष्यात एखादी दुर्घटना घडली तर त्याला गिरीराज सोसायटी जबाबदार न रहाता पोस्ट कार्यालय जबाबदार राहील, असे सोसायटीच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

> **गिरीराज सोसायटीची इमारत धोकादायक झाली आहे. नगरपालिका प्रशासनाकडून तशा प्रकारच्या एक-दोन नोटीस सोसायटीला आल्या आहेत. त्यानंतर इमारत खाली झाली, परंतु पोस्ट कार्यालय कार्यरत आहे. या कार्यालयात दररोज शेकडो लोक कामानिमित्त ये-जा करीत असतात. पोस्ट कार्यालयात भविष्यात एखादी दुर्घटना घडली तर त्यास सोसायटी जबाबदार न रहाता पोस्ट कार्यालय राहील.**
> **- बळीराम ठाकूर, अध्यक्ष- गिरीराज सोसायटी**

# उरण तालुका म्हणजे आओ जावो घर तुम्हारा

**। उरण । वार्ताहर ।**

तालुका म्हणजे आओ जावो घर तुम्हारा असे चित्र गेल्या काही वर्षांपासून दिसत आहे. या पार्श्वभूमीवर द्रोणागिरी नोडमधील नवघर सर्कल ते खोपटा पूल आणि खोपटा पूल ते पंजाब वेअर हाऊस रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात भंगारवाल्यांनी आपले बस्तान बसविले असल्याचे चित्र आहे.

नवघर सर्कलपासून काही आंतरावर असलेल्या भंगारवाल्याने तर सिडकोच्या अखत्यारीतील रस्त्याचा फुटपाथच गायब केला आहे. त्यानंतरही सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून संबंधितावर कारवाई कशी होत नाही. या ठिकाणी भंगारचे दुकान आणि आपल्या गावाकडून माणसे आणून त्यांना त्या ठिकाणी बसवीत आहे. सिडकोसह पोलीस किंवा अन्य कुणीही त्याच्यावर कारवाई



करतांना दिसत नाहीत.

अनेकजण आपल्याकडे येऊन चहा घेऊन जातात. त्यामुळे आपल्यावर कारवाई होण्याचा प्रश्नच नसल्याचे सूतोवाच या येथील एका भंगारवाल्याकडून केले जात असल्याचे चर्चा आहे. बऱ्याच ठिकाणी अशा भंगाराच्या दुकानांच्या जमिनी खालून ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहिन्या गेल्या आहेत. त्यामुळेच अशा भंगारच्या दुकानांमध्ये होणारा एखादा अपघात देखील उरणकरांसाठी अगदी खतरनाक ठरू शकतो. त्यामुळे ज्या सिडकोच्या जागांवर हे अशे परप्रांतीय भंगारवाले बसले आहेत. त्यांच्यावर सिडकोच्या अतिक्रमण विरोधी विभागाकडून कारवाईचा दांडू कधी फिरवणार, असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला जात आहे.

उरण तालुक्यातील विविध शासकीय मोकळ्या जागा आपल्या बापजाद्यांच्या असल्याच्या अविर्भावात परप्रांतीयांनी बळकावल्या आहेत. उरण शहराला लागून असलेल्या बोरी पाखाडी परिसरात गेल्या काही वर्षात भंगारवाल्यांनी आपले मिनी कुर्ला वसविण्याचे घाटले आहे. या ठिकाणी अनेक शासकीय जागांवर या भंगारवाल्यांनी आपली बेधडक भंगाराची गोदामे उभारली असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे हे बहुतांशी भंगारवाले अनधिकृतपणे या ठिकाणी वास्तव्य करीत असल्याचे माहिती असून देखील उरण नगरपरिषदेने या भागात काही ठिकाणी पक्क्या स्वरूपाचे सिमेंटचे रस्ते तयार केले असल्याचे भयंकर चित्र या ठिकाणी पाहायला मिळते.

शहराची ही अवस्था असताना सिडकोबाधित द्रोणागिरी नोड, नवघर विभाग, खोपटा पूल ते पंजाब वेअर हाऊस फाटा या बहुतांशी ठिकाणी भंगारवाल्यांनी सिडकोचे रस्ते आपल्याच पूर्वजांचे असल्याच्या अविर्भावात आपली दुकाने थाटली आहेत. सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथक स्थानिकांच्या गरजेपोटीच्या घरांवर कारवाई करण्यासाठी धावत येत असताना त्यांना या परप्रांतीय भंगारवाल्यांची ही भली मोठी सिडकोच्या रस्त्यांवर फुटपाथ खाऊन उभारलेली भंगाराची दुकाने मात्र दिसत नाहीत, अशी स्थिती आहे.

या परिसरात रात्रीच्या सुमारास काही वेगळा ही खेळ सुरू असल्यास त्याला देखील कोणाचाच अटकाव नाही. त्यामुळे या अनधिकृत परप्रांतीय भंगारवाल्यांवर सिडकोचा कारवाईचा हातोडा कधी फिरतो ते पाहावे लागणार आहे.

# सदानंद चव्हाण यांचा मुख्यमंत्र्यांना इशारा

## महायुतीमध्ये खळबळ

**। चिपळूण । वृत्तसंस्था ।**

चिपळूणमधून शिवसेनेचा उमेदवार दिला नाही, तर येथील शिवसेना संपण्याचा धोका निर्माण होणार असल्याचा, इशारा शिवसेनेचे उपनेते माजी आमदार सदानंद चव्हाण यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यानंतर सदानंद चव्हाण नाराज झाल्यामुळे महायुतीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. महायुतीच्या जागावाटपात चव्हाण यांना विश्वासात न घेतल्यामुळे त्यांचे कार्यकर्ते हे नाराज झाले आहेत. त्याचे पडसाद आगामी विधानसभा निवडणुकीत उमटण्याची शक्यता आहे. शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांना २००४ मध्ये पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे ते पक्षातून बाहेर पडले. त्या वेळी चिपळूणमधील शिवसेना पूर्णपणे भूईसपाट झाली होती. शिवसेनेच्या कठीण काळात चव्हाण यांनी पक्षाचे तालुकाप्रमुख पद घेतले आणि पुन्हा मतदार संघात शिवसेना उभी केली. २००९च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा उमेदवार निवडून आला. २०१४ मध्येही शिवसेनेने चिपळूणचा गड राखला. २०१९ मध्ये चव्हाण पराभूत झाले; मात्र राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर चव्हाण मनापासून या आघाडीमध्ये खुश नव्हते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेले. त्यांना सरकारी महामंडळ किंवा चिपळूणमधून पुन्हा उमेदवारी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले होते. महायुतीमध्ये चिपळूणचा उमेदवार निवडताना त्यांना विश्वासात घेतले गेले नाही. शिंदे यांची भेट घेतली आणि आपण नाराज असल्याचे त्यांनी सांगितले.

> **चिपळूणमध्ये राष्ट्रवादीला उमेदवारी मिळाली म्हणून मी नाराज नाही. २० वर्षात मी कष्टाने शिवसेना उभी केली. त्या शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह चिपळूणमधून हद्दपार होण्याचा धोका आहे. राष्ट्रवादीचा उमेदवार निवडून आल्यानंतर तो शिवसेना वाढवणार नाही. शिवसेनेचे मतदार राष्ट्रवादीच्या उमेदवाराला मतदान करण्याच्या मानसिकतेत नाहीत, ही व्यथा मी मुख्यमंत्री शिंदे यांना कळवली आहे. कार्यकर्त्यांशी चर्चा करून वेळप्रसंगी मी वेगळा निर्णय घेण्यात येईल.**
> **- सदानंद चव्हाण, माजी आमदार, चिपळूण.**

# जयगड सागरी पोलीसांचे जांभारीत संचलन

**रत्नागिरी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयगड पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांमध्ये कायद्याचा धाक राहावा. यासाठी जांभारी व इतर हद्दीमध्ये संचलन केले.

विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. प्रत्येक पोलीसांनी अंतर्गत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा आपापल्या विभागामध्ये सज्ज झाले आहे. जयगड सागरी पोलीस ठाणेअंतर्गत जांभारी गावात संचलन करण्यात आले. भैरी मंदिर, जमातवाडी, कटनाक वठार, वासावे वठार, पावरी वठार, झरवे वठार व तरी बंदर या मार्गे संचलन करण्यात आले. सीआयएसएफ पोलीस निरीक्षक सुनील जाधव व सागरी पोलीस ठाणे जयगडचे एपीआय कुलदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचलन झाले तसेच या वेळी जांभारीचे पोलीस पाटील उमेश चौगुले यांच्यासग पोलीस पाटील, अन्य अधिकारी उपस्थित होते.

# हरिहरेश्वर दुर्घटनेनंतर पर्यटन व्यवसायिकांच्या मनात भीतीचे वातावरण

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

पर्यटन व्यवसायीकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असा दिवाळी हंगाम काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाच हरिहरेश्वर येथे शनिवारी मध्यरात्री पुणे येथील अकरा मद्यधुंद पर्यटकांनी लॉज मालकाशी केलेली खोली भाड्यावरून वादावादी व वादावादीचे रुपांतर लॉज मालकाच्या बहिणीच्या अंगावर गाडी नेत जीवे मारल्याची घटना. या धक्कादायक घटनेनंतर श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन व्यवसायीकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

हरिहरेश्वर येथील ममता




होम स्टे चे मालक अभिजित धामणस्कर यांनी मद्यधुंद पर्यटकांना कमी भाड्यात खोली देण्यास नकार दिला. त्यानंतर धामणस्कर यांना झालेली मारहाण व स्थानिक येताच पळून जाणाऱ्या पर्यटकांपैकी एका पर्यटकास स्थानिकांनी पकडून ठेवल्याने आपल्या साथीदाराला सोडवण्यासाठी परत होम स्टे येथे आलेले दहा मद्यधुंद तरूण. साथीदाराला स्थानिक सोडत नाहीत याचा राग मनात ठेऊन धामणस्कर यांच्या बहिणीच्या अंगावर गाडी नेत चिरडून जीवे मारल्याच्या घटनेमुळे श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन व्यवसायीकांना आता आपण असुरक्षित झालोत, अशी भीती निर्माण झाली आहे.

या घटनेनंतर येथील पर्यटन व्यवसायीकांनी आपल्याला ही अनेकदा पर्यटकांकडून मनस्ताप होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. बहुतेक वेळा टोळक्याने आलेले तरुण रिसॉर्ट, होम स्टे व्यवस्थापनाशी अरेरावीची भाषा वापरतात. श्रीवर्धन तालुक्यात पर्यटनासाठी येणारे काही उत्साही पर्यटक आपल्या वाहनांच्या काचांना भारत सरकार, महाराष्ट्र शासन तसेच पोलीस नावाचे फलक व पुढील काचे जवळ पोलीस टोपी ठेवतात. यावेळेस आपण अधिकारी आहोत, अशी बतावणी करतात किंवा आमचे नातलग मोठ्या हुद्द्यावर कामाला आहेत, असे सांगत पर्यटन व्यवसायीकांशी दादागिरी करतात. अशा वेळी तुमची तक्रार वरपर्यंत करून तुमचा व्यवसायाचा परवाना रद्द करु अशी धमकी ही देण्यात येते.

दरम्यान, पोलीसांनी सदरच्या वाहनांची चौकशी करावी अशी मागणी जोर धरत आहे.

> **दिवेआगर समुद्र किनारा साडेचार किलोमीटर लांबीचा आहे. अनेकदा किनाऱ्यावर पर्यटक विशेषतः तरूणाईकडून नियमांचे उल्लंघन केले जाते. येथील सुवर्ण गणेश मंदिराजवळ सुरक्षीततेच्या कारणास्तव पोलीस चौकी आहे. तेथे पोलीस कर्मचारी असणे गरजेचे आहे. त्यामुळे उद्धट पर्यटकांवर वचक बसेल. बेधुंद पर्यटकांवर आता आळा बसणे गरजेचे आहे.**
> **-सिध्देश कोसबे, सरपंच, दिवेआगर ग्रामपंचायत**

## ४३ हजार नवीन मतदार नोंदणी, ६ लाख मतदारांची संख्या

# नव मतदार ठरवणार पनवेलचे भवितव्य

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**विधानसभा मतदारसंघात नव्याने झालेल्या मतदार नोंदणीत सुमारे ४३ हजार मतदार वाढल्याने पनवेल विधानसभेची मतदारसंख्या ६ लाखांच्या पार झाली आहे. यात ६५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार शहरी भागातील आहेत. या मतदारांवरच उमेदवारांचे भवितव्य अवलंबून राहणार असल्याचे चित्र दिसत आहे.**

एकेकाळी उरण आणि पनवेल हे दोन्ही मतदारसंघ एकच होते. सिडको प्रकल्पामुळे नवीन नोड स्थापन केले गेले. या नोडमध्ये कालांतराने शहरी मतदार वाढू लागले. शिवाय तालुक्यातील २३ ग्रामपंचायती पनवेल महानगरपालिकेत विलीन होऊन पनवेल महापालिका उदयास आली. मुंबईतील वाहतूक कोंडी, प्रदूषण, गर्दी यामुळे अनेकांनी पनवेल परिसरात धाव घेतली. यामुळे झपाट्याने शहराची लोकसंख्या वाढली. पनवेल विधानसभा मतदारसंघातील ५४४ पैकी जवळपास ३७० बूथ शहरी भागातील असल्यामुळे येथील उमेदवारांना शहरी मतदारांवर आपली छाप सोडावी लागणार आहे. सध्याच्या घडीला पनवेल विधानसभेत भाजपकडून आमदार प्रशांत ठाकूर, शेकापमधून माजी आमदार बाळाराम पाटील तसेच उद्धवसेवेतून शिरीष घरत आणि लीना गरड यांची नावे चर्चेत आहेत. अपक्ष म्हणून कांतीलाल कडूदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. पनवेलमधील मतदार-३,३७,९०९ पुरुष २,९६,२१५ महिला आणि ७३ तृतीय पंथी अशी ६,३४,१९७ एकूण मतदारांची संख्या आहे.

शहरी भागात खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, नावडे, कामोठे, तळोजे या सिडकोनिर्मित वसाहतीत ३१७ बूथ आहेत. तर ग्रामीण भागात १४४ बूथ आहेत. यामध्ये देखील ग्रामीण भागाचे झपाट्याने शहरीकरण होत आहे. लोकसभा निवडणुकीत शिंदेसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांना ३१ हजारांचा लीड मिळाला होता, तर उद्धवसेनेच्या मशाल चिन्हावर लढणाऱ्या संजोग वाघेरे यांनादेखील पनवेलध्ये फटका बसला होता. यामुळे शहरी मतदारांवर डोळा ठेवून अनेक संभाव्य उमेदवारांनी आपल्या परीने प्रचाराला सुरुवात केली आहे. पनवेलमध्ये सिडकोने नैना प्रकल्प राबविला आहे. या प्रकल्पाच्या धोरणाविरोधात वेळोवेळी निदर्शन करण्यात आली. नैना प्रकल्पाबाबत नाराजी हा ग्रामीण भागातील कळीचा मुद्दा आहे. पनवेलची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सिडको एकीकडे हजारो घरांचे गृहप्रकल्प उभारत असताना दुसरीकडे पूर्वीच्या गृहप्रकल्पांना मुबलक पाणी मिळत नाही. याव्यतिरिक्त पालिका हद्दीत वाढीव मालमत्ता कर, प्रदूषण हे विषय मोठ्या प्रमाणात गाजत आहेत.

त्यामुळे पनवेल विधानसभा मतदारद संघात कोणता उमेदवार कशा प्रकारे मतदारांवर छाप पाडणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे, तसेच मतदारा राजा हा कोणाच्या पारड्यात मतांचे दान टाकणार हे मतदान यंत्र उघडल्यावरच समोर येणार आहे.

# बोर्ली-अलिबाग विशेष एसटी बसची मागणी

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

बोर्ली बसस्थानकातून सकाळी ६ ते ६.३० या वेळेत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रेवदंडा आणि अलिबाग येथे जाणाऱ्या गाड्यांच्या कमतरतेमुळे अत्यंत गैरसोय होत आहे. गाड्यांच्या कमतरतेमुळे मुले शाळेत खूप उशिरा पोहचल्याने त्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत असून तातडीने गाड्यांची संख्या वाढवून मुलांना दिलासा द्यावा, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे शेतकरी कामगार पक्षाचे बोर्ली ग्रामपंचायत सदस्य मनोहर गजानन भोपी यांनी केली आहे.

मुरुड आगार प्रमुख यांच्याकडे मागणी करताना त्यांनी सांगितले की, मुरूड येथून येणाऱ्या मुंबई, भांडुप,



धुळे आदी लांब पल्यांच्या गाड्या गर्दीमुळे बोर्ली बस स्थानकावर बरेचदा थांबत नाहीत किंवा जागेअभावी विद्यार्थ्यांना प्रवास करणे शक्य होत नाही. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, विशेषतः विद्यार्थिनींचे अतोनात हाल होतात. सध्याचे दिवस पाहता मुलींची सुरक्षितता या विषयास निश्चित प्राधान्य देणे आवश्यक आहे.

चौल-मांडला-चौल या गाडीची नियोजित वेळ सकाळी सात नंतरची आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्याचा विशेष करुन कोणताही फायदा होत नाही.

# आंबेडकर भवनाच्या जागेबाबत संभ्रम

**। नेरळ/वेणगाव । प्रतिनिधी ।**

**कर्जत शहरात उभ्या राहणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित भवनाच्या जागेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. समाजाच्या कार्यकर्त्यांनी जागेबाबत निर्माण झालेला संभ्रम पालिकेने दूर करावा, अशी मागणी करणारे निवेदन कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना सोमवारी (दि.२१) सादर केले आहे.**



कर्जत शहरात उभ्या राहणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या जागेबाबत संभ्रम आहे. भवनाच्या भूमिपूजन सोहळ्यात आ. महेंद्र थोरवे यांनी १३ गुंठे जमिनीवर भवन राहणार असल्याची माहिती दिली होती. मात्र, प्रत्यक्षात या ठिकाणच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर आणि मालमत्ता पत्रावर केवळ तीन ते चार गुंठे जागा उपलब्ध आहे. यामुळे अल्प जागेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन कसे उभे राहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच, आपल्या समजाची घोर फसवणुक होत असून भवनाच्या जागेची दिशाभूल केली जात असल्याची भावना येथील नागरिकांमध्ये आहे.

तसेच, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथील बायोगॅस प्रकल्पाच्या ३ गुंठे जागेत कचऱ्याच्या ठिकाणी नको. बायोगॅस प्रकल्पाची जागा खूप गुंतागुंतीची असून सर्विस रोडमध्ये जात आहे. या जागेवर पार्किंग झोन आहे. यामुळे १३ गुंठे जागा सांगून ३ गुंठे जागेत आंबेडकर भवन नको आहे. तसेच,

### ■ आ. थोरवेंचे फसवे भूमिपूजन

भूमिपूजन केलेल्या जागेला विरोध असून येथे कुठल्याही प्रकारचे भवनाचे काम सुरू करू नये असे निवेदन कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना सादर करण्यात आले आहे.

यावेळी उत्तम जाधव, सुशील जाधव, सुनील गायकवाड, विजय डाळिंबकर, संजय अभंगे, आशिष खंडागळे, रोहित जाधव, अमोल साळवी, राहुल गायकवाड, अ‍ॅड. सुरज पंडित, सुशील जाधव, राजू ढोले, प्रमोद गायकवाड, प्रशांत जाधव, रोहित सरवते, नरेश जाधव, विद्यानंद वोव्हळ, भालचंद्र गायकवाड, अक्षय निकाळजे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

> **सन २०१० साली घेण्यात आलेल्या ठरावातील मुद्रे बुद्रुक मधील १३ गुंठे जागा नगरपरिषदेच्या ताब्यात नाही. म्हणून आम्ही तो ठराव रद्द केला आहे. नगरपरिषदेच्या ताब्यात असणाऱ्या कचऱ्याच्या बायोगॅस प्रकल्प शेजारी पर्यायी जागेचा ऑक्टोबर महिन्यात नव्याने ठराव घेण्यात आला आहे. ही जागा ८ गुंठे आहे. या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला शासकीय कोणताच निधी नसल्याने तो कार्यक्रम नगरपरिषदेचा किंवा शासकीय नव्हता. तसेच, या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवना व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही नावाने भवनाचा ठराव घेण्यात आलेला नाही. तसेच, या जागे शेजारी असणाऱ्या कृषी संशोधन केंद्राची काही गुंठे जागा आंबेडकर भावनासाठी मागणी करत आहोत.**
>
> **– वैभव गारवे, मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद**



# अवजड वाहनांचे अपघाताला आमंत्रण

**। पनवेल । वार्ताहर ।**

सायन-पनवेल महामार्गावर रस्त्याच्या मधोमध अवजड वाहने उभी केली जात आहेत. यापुर्वी कामोठे टोल नाक्यापुढे उभ्या करण्यात येत असलेल्या वाहनांमुळे एका दुचाकी स्वाराचा जीव गेल्याची घटना घडलेली असताना वाहतूक विभाग या प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याने आहे. यामुळे वाहतूक विभागाच्या या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत.

महामार्गावरून प्रवास करताना शक्यतो मार्गाच्या कडेला वाहन उभी करावीत, असा नियम आहे. मधोमध वाहन उभी केल्यास अपघात होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारचा नियम पाळण्याच्या सूचना वाहन चालकांना वाहतूक विभागाकडून देण्यात आल्या आहेत. कामोठे टोलनाक्यावर मात्र हा नियम पायदळी तुडवण्यात येत असल्याने वाहतूक विभागाने हा प्रकार गांभीर्याने घेऊन मधोमध वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

# पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश



**। रसायनी । वार्ताहर ।**

सतत पडणाऱ्या पावसामुळे खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्याचे पंचनामे करण्याचे आदेश खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिले आहेत.

गेले चार ते पाच दिवस सतत पावसाचे थैमान सुरू आहे. तत्पूर्वी पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे खुप मोठे नुकसान केले आहे. पिकलेले भात वादळ वारा आणि जोरदार पावसाने आडवे झाले आहे. हे भात चिखलात रुतून बसले आहेत, यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. यावेळी ओला दुष्काळ जाहिर करण्याची मागणी जोर धरत आहे. याची माहिती खालापूर तालुका कृषी विभाग यांच्या मार्फत खालापूर तहसीलदार यांना कळविण्यात आली आहे. शेतीपीक व फळपिक नुकसानीचे पंचनामे ३३ टक्के पेक्षा जास्त असणाऱ्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिले आहेत.

तसेच, हे पंचनामे तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे जमा करण्या बाबत माहिती देण्यात आली आहे. सर्व मंडळ अधिकारी, कृषी सहायक, तलाठी व ग्रामपंचायत अधिकारीयांनातातडीनेकळविण्यात आले आहे. अशी माहिती निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिली.

## महाडमध्ये निवारा शेडची आवश्यकता

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

महाड शहरातील छ.शिवाजी महाराज चौक आणि वीरेश्वर महाराज चौक येथे प्रवाशांसाठी निवारा शेडची नितांत आवश्यकता आहे. पूर्वी छ.शिवाजी महाराज चौक येथे निवारा शेड होती. परंतु, येथे आता गाळे उभे राहिले आहेत. माणगाव, पनवेल, मुंबई, पुणे, सातारा इ. ठिकाणी जाणारे प्रवासी उन्हातान्हात तसेच पावसात एसटीची वाट पहात उभे असतात. तरी वरील दोन ठिकाणी लवकरात लवकर प्रवाशांसाठी निवारा शेड उभारण्यात येऊन एस.टी. ने प्रवास करणा-या प्रवाशांची गैरसोय सक्षम यंत्रणेने दूर करावी व प्रवाशांचे हाल थांबवावेत, अशी रास्त मागणी प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

# वडगाव राजिप शाळेचे कौतुक



**। रसायनी । वार्ताहर ।**

विद्यादान व प्रसारण करणारे शिक्षक आणि विद्या आत्मसात करणारे विद्यार्थी हे एकत्र आल्यावर शिक्षणाचा पाया मजबुत होतो. तसेच, शिक्षणाचा स्तर अधिक उंच होतो, असे गौरवोद्गार खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदिप कराड यांनी काढले आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगावचा ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ या उपक्रमात तालुक्यात व जिल्ह्यात प्रथम तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल खालापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी शाळेला भेट दिली. यावेळी ते बोलत होते. यावेळी विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल उपस्थित होते. वडगाव शाळा ही मॉडेल स्कूल म्हणून नावलौकिक मिळवत आहे, या शाळेच्या विकासात अजून काही योगदान देता येत असेल तर नक्की द्यावे. राठोड गुरुजी व सर्व शिक्षक चांगले काम करत आहेत त्यांचे मनापासून कौतुक. या कामामुळे आज त्यांच्या पाठीवर शाबासकीचा वर्षाव होत आहे, असे गटविकास अधिकारी संदिप कराड म्हणाले.

## मतदार जनजागृती

**। शिहू । वार्ताहर ।**

शिहू येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान महाविद्यालयातर्फे मतदार जनजागृती करण्यासाठी जोगेश्वरी नगर परिसरात मंगळवारी (दि.२२) रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. अगामी विधानसभा निवडणुकीत मतदाराचा टक्का वाढावा व जनतेने भयमुक्त वातावरणात निवडणुकीत सहभागी व्हावे म्हणून मतदार घोषवाक्याद्वारे जनजागृती अभियान राबविण्यात आले. या रॅलीचे आयोजन डॉ. दिनेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना आणि निरंतर व विस्तार विभागातर्फे राबविण्यात आले. यासाठी डॉ. श्रीकृष्ण तुपारे, डॉ. मनोहर शिरसाठ, डॉ. राणी ठाकरे यांनी मेहनत घेतली. याप्रसंगी डॉ. संदेश गुरव, डॉ. विजय चव्हाण, जयेश पाटील व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## बाल्या, माळी नाचातुन प्रबोधन

**। पाली । वार्ताहर ।**

पूर्वजांकडून मिळालेली ही पारंपारीक बाल्या आणि माळी नाचाची कला जिवंत ठेवण्यासाठी पेण तालुक्यातील दुरशेत गावातील सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेतला आहे. या वर्षी देखील दसऱ्याच्या मुहूर्तावर बाल्या नाच आणि माळी नाचाची बारी झाली. तसेच, हे तरुण व लहानगे या नाचातुन प्रबोधन सुद्धा करत आहेत.

आधुनिकतेच्या युगात समाजामध्ये बाल्या आणि माळी नाचाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. तरुण पिढीने याकडे पाठ फिरवल्यामुळे ही लोककला आता लोप पावत चालली आहे. आपल्या पुर्वजांची हि कला टिकावी, तिचे जतन व्हावे यासाठी दुरशेत गावातील सुशिक्षीत तरुण आपापली नोकरी व व्यवसाय सांभाळून मागील पंधरा वर्षापासून हि कला जोपासत आहेत. ही कला जतन करण्यासाठी गावातील लोकांचा खुप मोठा सहभाग व सहकार्य आहे. प्रत्येक कार्यक्रम विळी दूरशेत गावातील ग्रामस्थ तरुणांसोबत असतात. विशेष म्हणजे आपली पारंपारीक कला आपली मूल आपली नातवंड पुढे नेत असल्याचा गावातील वृद्धांना खूप आनंद व समाधान वाटत आहे.



# राष्ट्रप्रेम साधण्यासाठी सैन्यात प्रवेश करा



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

युवकांनी साहस आणि राष्ट्रप्रेम अशा दोन्हीही गोष्टी साध्य होणारे स्फूर्तिदायी करिअर निवडून सैन्य दलामध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन निवृत्त कॅप्टन उमेश वाणी यांनी युवकांशी संवाद साधताना केले.

**कॅप्टन उमेश वाणी यांचे आवाहन**

सेंट्रल हिंदू मिलटरी एज्युकेशन सोसायटी नाशीक व हिंदू एज्युकेशन सोसायटी मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने ओंकार विद्यामंदीर ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी कॅप्टन उमेश वाणी, हिंदू एज्युकेशन सोसायटी मुरुडचे चेअरमन दिलीप जोशी, कोषाध्यक्ष मनोहर गुरव, विश्वस्त दिलीप दांडेकर, दिपाली जोशी, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी, अनुप सिंह, सचिव सुनील विरकुड आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना कॅप्टन वाणी यांनी भूदल आणि नौदलात प्रवेश करण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधींबाबत विस्तृत माहिती दिली. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिक्षां विषयी माहिती देताना विद्यार्थ्यांनी चालु घडामोडींचा वेध घेत सामान्य ज्ञान व शारीरिक तंदुरुस्ती संदर्भात खुपशा प्रेरणादायी बाबी कथन करून विद्यार्थ्यांना प्रेरीत केले.

## सतिन्द्रनाथ फडकर यांचे निधन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



माहीम संस्थेच्या विद्यामंदिर मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. सतिन्द्रनाथ फडकर यांचे रविवारी (दि.१३) विलेपार्ले येथे निधन झाले. सतिन्द्रनाथ यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी नेरळ विद्यामंदिर संकुलामध्ये शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेत डॉ. मिलिंद पोतदार, अरुण धारप, विवेक पोतदार, दिलीप गडकरी, सुशांत बदले, डॉ. नंदकुमार इंगळे, प्रमोद विचवे, परदेशी, सोनाली पाटील आदी उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी आपली मनोगते व्यक्त करताना अ‍ॅड. फडकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.



# पतसंस्थेच्या अध्यक्षपदी वेत्रवान गुरव

**। रोहा । प्रतिनिधी ।**

सुधागड एज्युकेशन सोसायटीतील सेवक वर्ग सहकारी पतसंस्था मर्यादित पालीच्या अध्यक्षपदी वेत्रवान गुरव व उपाध्यक्षपदी हणमंत चव्हाण यांची नियुक्ती बिनविरोध करण्यात आली.

सु.ए.सो. पतपेढीचे विद्यमान अध्यक्ष रविंद्र घोसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत घोसाळकर यांनी राजीनामा दिल्याने पुढील तीन वर्षाकरिता हि निवड करण्यात आली आहे. पतपेढीची स्थापना झाल्यापासून ते आजपर्यंत पतपेढीचे कामकाज सुरळीत चालू आहे. यापुढेही पतपेढीची उत्तरोत्तर प्रगती होत राहिली पाहिजे, असा विश्वास संचालक मंडळाच्यावतीने करण्यात आला. तसेच, पतपेढीचे काम काटेकोर सुरु आहे आणि यापुढेही राहील, असा विश्वास नवनियुक्त अध्यक्ष वेत्रवान गुरव व उपाध्यक्ष हणमंत चव्हाण यांनी व्यक्त केला.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएनल संपर्क :- ८२७५११९८८३.
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी मावशी (आया) हवी आहे. संपर्क : ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- संपर्क संस्था पोयनाड (अलिबाग) बालग्रामसाठी १) अधीक्षक, २) सोशल वर्कर, ३) समुपदेशक पदे त्वरीत भरणे आहे. संपर्क- ९७६६५४२१७५, इमेल - samparc@gmail.com
- कल्पवृक्ष रिसॉर्ट वरसोली येथील किचन चालवायाला देणे आहे. संपर्क - ९३७३९७८९२५/ ९६८९५६७१०१
- वर पाहिजे-वधू ३९ वर्षे बी.कॉम, विधवा १ मुलगी इच्छुक असणाऱ्यांनी फोन करा किंवा वॉट्स अप वर माहिती पाठवा. ७३७८४८०१५१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### कास पठाराचा भास; पर्यटकांचे आकर्षण

# जिल्हा बहरला रंगीबेरंगी रानफुलांनी

**। पाली । वार्ताहर ।**

**रायगड जिल्ह्यातील विविध पठारांवर ऑक्टोबर महिन्यात फिरतांना पिवळी सोनकीची फुले तसेच युट्रीक्युलारीया व कारवीची जांभळी-निळी आकर्षक फुले लक्ष वेधून घेत आहेत. यामुळे हे ठिकाण कास पठार असल्याप्रमाणे वाटत आहे. यामुळे अनेक पर्यटक या ठिकाणी आवर्जून थांबतात.**



माथेरान, माणगाव, पोलादपूर, म्हसळा, तळा आदी तालुक्यातील रानमाळावर तसेच डोंगरावर ही फुले बहरलेली आहेत. जांभळ्या-निळ्या रंगाची चिटुकली आकर्षक फुले दृष्टीक्षेपात पडताच सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. मात्र, ही वनस्पती शिकारी असून मांसाहारी आहे. याबाबत अनेकजण अनभिज्ञ आहेत. युट्रीक्युलारीया हे या वनस्पतीचे शास्त्रीय नाव असून तिला ‘सीतेची आसवे’ म्हणून ओळखले जाते. तर,

### युट्रीक्युलारीया कीटकभक्षी वनस्पती

**या हंगामात सह्याद्रीच्या खडकाळ पठारांवर ही वनस्पती मोठ्या प्रमाणात उगवते. ती अवघी ७ सेंटीमीटर उंचीची असून अगदी बोटांच्या नखांएवढी लहान मात्र आकर्षक जांभळ्या-निळ्या रंगाची फुल युट्रीक्युलारीया या वनस्पतीला येतात. तसेच, युट्रीक्युलारीयाला कीटकभक्षी वनस्पती म्हटले की, डोळ्यांसमोर चिकट द्रावाचे द्रोण भरलेल्या वनस्पती येतात. पण ही वनस्पती वेगळी आहे. म्हणजे या वनस्पतीच्या खोड व मुळांवर सुक्ष्म छिद्र आणि दाट केस असलेल्या पिशव्या असतात. या पिशव्या म्हणजे तिचे जठरच. या पिशव्यांध्ये अतिसुक्ष्म कीटक अडकतात आणि पचवलेसुद्धा जातात.**

कारवी ही डोंगर उतारांवर वाढणारी झुडूप वजा बहुपयोगी वनस्पती आहे. जिल्ह्यातील डोंगर व जंगलात सध्या कारविला मोठ्या प्रमाणात एकत्रित बहर आला आहे. जांभळ्या रंगांची आकर्षक टपोरी फुले जंगल व डोंगराची शोभा वाढवत आहेत. यामुळे पर्यटक देखील आकर्षित होत आहेत. ही वनस्पती मातीची धूप रोखण्याचे काम करते. शिवाय हिच्या फांद्यांपासून आदिवासी बांधव आपली घरे तयार करतात. कारवी जैवविविधता व जंगल संवर्धनास हातभार लावते असे असंख्य फायदे या वनस्पतीचे आहेत.

> **कारवीचे अनोखे वैशिष्ट्य म्हणजे तिचे एकत्रित बहरणे हे आहे. यावेळी सृष्टीचा एक अलौकिक रंग सोहळा असल्यासारखे वाटते. ही झाडे सलग सात वर्षे वाढतात आणि आठव्या वर्षी सर्व झाडे एकाच वेळी फुलतात. जांभळ्या रंगाची टपोऱ्या फुलांनी ही झाडे बहरतात तेव्हा जंगल व डोंगर उतारांना जणूकाही जांभळ्या रंगांची चादर ओढल्याप्रमाणे वाटते. या फुलांमधे भरपूर पराग आणि मकर मिळत असल्यामुळे मधमाश्या या बहराच्या वेळी कारवीच्या जाळीवरच बसतात.**
>
> **– रणजित म्हात्रे, वनस्पती व निसर्ग अभ्यासक**

# उमेदवार आईचे नाव लावणार का?

## ■ विधानसभा निवडणुकीतही अंमलबजावणीकडे दुर्लक्ष

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने जन्मदात्या आईचे नाव प्रत्येक नावासोबत लावण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, मात्र राज्यात आता विधानसभा निवडणुका येऊन ठेपल्या असतानाही त्याची नीट अंमलबजावणी होऊ शकली नाही. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत प्रत्येक उमेदवारांच्या नावापुढे आईचे नाव लावण्याची अंमलबजावणी केली जाईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यात १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्यांचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर त्यासाठीचा धोरणात्मक निर्णयही जारी करण्यात आला आहे, मात्र राज्यात मागील काही महिन्यांत लाडक्या बहिणीचा गाजावाजा करण्यात आईच्या नावाचाच सरकारला विसर पडला होता. त्यामुळे शासकीय कामकाजात आईच्या नावाची अजूनही प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही. काही अपवाद वगळता राजकीय नेते, पदाधिकाऱ्यांमध्येही आपल्या नावापुढे आईचे नाव जोडून घेण्याचा विसर पडला आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात झालेल्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजातही आईचे नाव लावण्यात आले नव्हते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवारांच्या नावापुढे आईचे नाव जोडण्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी स्त्रीवादी संघटना, महिला साहित्यिक, विविध संघटनांच्या प्रतिनिधींकडून केली जात आहे. मंत्रालयात, विधान भवनातही निराशाआपल्या नावापुढे आईचे नाव लावण्यासाठी मंत्रालयात काही मंत्र्यांनी आपल्या नावाच्या पाट्या लावून त्याला पाठिंबा दर्शवला, तर काहींनी त्याकडे डोळेझाक केली. अजूनही आपल्या नावाच्या पाट्यांमध्ये बदल करून घेण्यात अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होताना दिसते.

### इथे जोडले जाणार आईचे नाव

**१ मे २०२४ रोजी व त्यानंतर जन्मलेल्या सर्व बालकांच्या नावाची नोंद बालकाचे नाव, आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपातच करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशीच नोंद सर्व शैक्षणिक कागदपत्रे, महसुली दस्तऐवज, वेतन चिठ्ठी, सेवापुस्तक, विविध परीक्षांच्या अर्जाचे नमुने आदी शासकीय दस्तऐवजामध्येही करावी लागणार आहे.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

# खारघर मध्ये 'सिडको'ची ३८४३ घरे

## ग्राहकांची गर्दी

**। पनवेल । वार्ताहर ।**

'सिडको'ने दसऱ्याच्या मुहूर्तावर २६ हजार सदनिकांच्या महागृहनिर्माण योजना साठी जाहीर केलेल्या सोडत प्रक्रियेत खारघर परिसरातील ३,८४३ घरे उपलब्ध केली आहेत. सदर गृहप्रकल्प खारघर रेल्वे स्थानक आणि नवी मुंबई मेट्रो स्थानक शेजारी असल्यामुळे घरांना पसंती देत तेथील सॅम्पल फ्लॅट पाहण्यासाठी नागरिकांकडून गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे.



पंतप्रधान आवास योजना अंतर्गत सिडकोने सर्वांसाठी घर या योजना अंतर्गत नवी मुंबई आणि पनवेल महापालिका हद्दीत ४० हजार घरांचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, दसऱ्याच्या मुहूर्तावर महागृहनिर्माण योजना अंतर्गत सिडकोने २६ हजार सदनिकांची गृहनिर्माण योजना जाहीर केली आहे. त्यामध्ये खारघर रेल्वे स्थानकाशेजारी १८०३, खारघर सेक्टर-१४ डी-मार्ट समोर १७०० तर खारघर गांव मेट्रो स्थानक शेजारी ३४० अशी एकूण ३,८४३ घरे सोडतीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विशेष म्हणजे खारघर रेल्वे स्थानक पासून ५० मीटर अंतरावर गृहनिर्माण प्रकल्पात १५ मजल्याच्या एकूण १७ इमारती असून ५४० चौरस फुट चटई क्षेत्रफळ असलेली सर्व घरे टुबीएचके प्रकाराची आहेत. विशेष म्हणजे सदर गृहप्रकल्पालगत खाडीकिनारा आहे.

त्यामुळे थंड वातावरण तसेच इमारतीच्या छत आणि गच्चीवरुन समुद्रात येणाऱ्या भरती-ओहोटीचा आनंद घेता येणार आहे. तर खाडीच्या दुसऱ्या भागाला नवी मुंबई विमानतळ आहे. तसेच या गृहप्रकल्पाला लागून खारघर-बेलापूर कोस्टल रोड उभारला जाणार आहे. या गृह प्रकल्पावरुन कोस्टल रोड मार्गे बेलापूर मार्गे मुंबई तसेच नवी मुंबई विमानतळ गाठण्यासाठी सोयीचे होणार आहेत.

सेक्टर- १४ बस डेपो येथे या ठिकाणी १७०० घरे असून सदर घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध आहे. सेक्टर-१४ बस टर्मिनस लगत अल्प उत्पन्न गटासाठी ३४० घरे उपलब्ध करून देण्यात आली आहे. येथील सदनिकांचे क्षेत्रफळ ३२२ चौरस फुट चटई असणार आहे. खारघर, सेक्टर-१४ मधील गृहप्रकल्प नवी मुंबई मेट्रो मार्गातील खारघर गांव मेट्रो स्थानकालगत आहे. तसेच आजुबाजुला मार्केट परिसर आहे.

# रानसई येथून १५ दिवसांपासून जोडपे बेपत्ता

**। वावोशी। वार्ताहर।**

वावोशी पोलीस दुरक्षेत्राच्या हद्दीतील शिरवली ग्रामपंचायत मधील रानसई आदिवासी वाडीतील संतोष लक्ष्मण वाघमारे (वय ३५) व सुवर्णा भरत जाधव (वय ३०) हे दोघेही दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ पासून बेपत्ता आहेत.

संतोष लक्ष्मण वाघमारे व सुवर्णा भरत जाधव राहणार रानसई आदिवासी वाडी हे दोघेही दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री नऊ वाजताच्या दरम्यान घरात कोणास काही न सांगता अचानक गायब झाले आहेत. आज या घटनेला तब्बल १५ दिवस होत आले असून त्यांच्या नातेवाईक, मित्रमंडळीकडे जाऊन चौकशी केली तरीदेखील त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. तरी सदरील महिला आणि पुरुष यांचा कसून तपास करत असून हे दोघेही आपल्या गावात अगर आजूबाजूचे परिसरात निदर्शनास आल्यास तात्काळ वावोशी दुरक्षेत्र व खालापूर पोलीस ठाणे यांना संपर्क करावा अशी विनंती सर्व नागरिकांना करण्यात आली आहे. सदर घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक केतन सांगळे हे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशील श्री. सुरेश हरी पाटील, रा. पांडापुर, पो. कासु, ता. पेण, जि. रायगड यांनी घनशाम बापू कवठणकर, राजेश नामदेव बोरकर, शारदाप्रसाद रामराज तिवारी, शांतिलाल नथमल सोनेगरा, शोभनाथ आज्ञाप्रसाद मिश्रा व सुरेश यशवंत पवार यांचे सामाईक मालकीच्या खालील नमुद केलेल्या भातशेती जमीन मिळकतीचे असलेल्या एकुण सामाईक क्षेत्रापैकी सहकब्जेधारक शांतिलाल नथमल सोनेगरा व शारदाप्रसाद रामराज तिवारी यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्राची स्थावर जमीन मिळकत कायमखुश मालकीहक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे अशिल व संबंधीत विद्यमान ज्ञात मालक/हिस्साधारक यांचेमध्ये बोलणी होऊन त्यांचेसोबत व्यवहार कायम झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार रु पै | पैकी खरेदी क्षेत्र (हे.आर) | जमीन मालकाचे नाव / हिस्साधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| खारबुर्डी ता.पेण | ११/६/अ | ०-१५-३० | १-४२ | ०-०२-०० | शांतिलाल नथमल सोनेगरा |
| | | | | ०-०३-३० | शारदाप्रसाद रामराज तिवारी |

वरील जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरहू मिळकतीचे ज्ञात मालक /हिस्साधारक यांनी आमचे अशिलांनी दिलेला आहे. तरी देखील सदरील जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, जमीनीचे मुळ मालकाचा अगर त्यांचे वारसांचा, सहकब्जा-हिस्सधारक यांचा, कोणत्याही बँकेचा, संस्थेचा, गहाण, लिन, लिज, दान, बक्षिस, खरेदी, साठेकरार, इतर कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा, वसूली अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, महसुल वाद, दिवाणी दावा इत्यादी काहीही असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतीबाबत आमचे अशिल विद्यमान मालक सहकब्जा-हिस्साधारक यांचे बरोबर, वर नमुद केलेल्या मिळकतीचा व्यवहार नोंदणीद्वारे पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर केले असे.

पेण
दिनांक: २४/१०/२०२४

**अॅड.सरिता प्रविण माळी**
फ्लॅट नंबर २०१/०९ ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स,
ए विंग, दुसरा मजला, वीर सावरकर मार्ग,
गोविंद बाग, कौंडाळतळे, मु.पो., ता. पेण,
जि.रायगड ४०२१०७
भ्रमणध्वनी क्र.८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

# 'बीबीए' आणि 'बीसीए' अभ्यासक्रम रखडले

**। रायगड । वार्ताहर ।**

मुंबई विद्यापीठाकडे संबंधित अभ्यासमंडळ व अभ्यासक्रमच तयार नसल्याने शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम सुरू करता आलेले नाहीत. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थी या अभ्यासक्रमापासून वंचित राहिले आहेत. मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यासाठी गांभीर्याने विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

२०२४-२५ पासून बीबीए, बीसीए आणि बीएमएस हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद म्हणजेच 'एआयसीटीई'ने आपल्या अखत्यारित आणण्याचा निर्णय घेतला होता. तसेच हे अभ्यासक्रम राबवण्यासाठी महाविद्यालयांना 'एआयसीटीई'ची मंजुरीही अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर 'एआयसीटीई'च्या परिपत्रकानुसार या अभ्यासक्रमांसाठी बहुसंख्य व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी आवश्यक शुल्क भरून अर्ज केले होते. हे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू करण्यास मान्यताही मिळाली. त्यानंतर मुंबई विद्यापीठाकडे मान्यतेसाठी रितसर शुल्क भरून अर्ज सादर करण्यात आले. परंतु या अभ्यासक्रमांसाठी संबंधित अभ्यासमंडळ व अभ्यासक्रमच तयार नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम सुरू करता येणार नाही, असे मुंबई विद्यापीठाकडून संबंधित महाविद्यालयांना कळवले आहे. वास्तविक विद्यापीठात अभ्यास मंडळ स्थापन करून या अभ्यासक्रमांना मान्यता देणे आवश्यक होते. सदर अभ्यासक्रम हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इतर नामांकित विद्यापीठात अनेक वर्षांपासून राबविले जातात. त्यामुळे विद्यापीठाने त्वरित पावले उचलावीत आणि सदर अभ्यासक्रमांसाठी अभ्यास मंडळे स्थापन करून अभ्यासक्रम तयार करावा. यासंदर्भात मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना पत्रही दिले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| ऋषिकेश अरुण गायकवाड विद्या ऋषिकेश गायकवाड | ३६ | ३ | ०-५८-८० यापैकी क्षेत्र ०-३८-८० | ९=१३ |
| | ३६ | ७ | ०-४९-५० यापैकी क्षेत्र ०-२९-५० | ८=१४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : / १० / २०२४
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पैकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत.

**अनु. क्र. 1: कामाचे नाव: कोकण रेल्वेच्या महाराष्ट्रामधील मार्गावर किमी 30/3-4 येथील माणगाव स्थानक यार्डमधील एफओबी स्ट्रक्चरचे रंगकाम. निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-एफओबी-2024-13 **दिनांक:** 24/10/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 5,30,332.65/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 31/10/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख/ वेळ:** 18/11/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 6 महिने.

**अनु. क्र. 2: कामाचे नाव: चिपळूण येथील स्टाफ क्वार्टर्सचे दरवाजे बदलणे, रूफ टॉपवर जीआय शीटची तरतूद करणे आणि रंगकाम. निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-चिपळूण-2024-08 **दिनांक:** 24/10/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 31,22,993.85/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 31/10/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 18/11/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 6 महिने.

**अनु. क्र. 3: कामाचे नाव: एसएसई/कार्य/माणगाव विभागांतर्गत देखभाल, किरकोळ कामे, दुरुस्तीची कामे आणि साहित्याचा पुरवठा यासाठी विभागीय करार. निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-झोनल-2024-12 **दिनांक:** 24/10/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 59,18,487.20/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 31/10/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 18/11/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 24 महिने.

**अनु. क्र. 4: कामाचे नाव: एसएसई/कार्ये/कणकवली अनुभागाच्या अंतर्गत देखभाल, पेटी कामाच्या दुरुस्ती कामासाठी सेक्शनल कॉंट्रॅक्ट आणि साहित्याचा पुरवठा. निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-झोनल-2024-10 **दिनांक:** 24/10/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 29,64,694.20/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 31/10/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 18/11/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 12 महिने.

मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. अविनाश मधुकर कडू, यांनी जमीन मालक १.श्री.स्वराजसिंग पुत्र दिवानसिंह, २. श्री. दिवाणसिंग चिरंजीलाल सिंग, ३. श्री. देशराजसिंग पुत्र दिवाणसिंग यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

**१. श्री. स्वराजसिंग पुत्र दिवानसिंह, यांचे नावे असलेल्या मिळकती**

| अ.न | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १६० | ०.१०.९० | १.०६ |
| २ | १६१/१ | ०.०७.१० | ०.५३ |
| ३ | १५९ | ०.१७.७० | ०.५३ |
| ४ | ४५/६ | ०.५१.०० | ०.२२ |
| ५ | ४५/५ | ०.६९.०० | ०.३७ |
| ६ | ४५/३ | ०.३३.०० | ०.२२ |
| ७ | ४४ | ०.०२.५० | ०.२५ |
| ८ | ४२ | ०.१८.५० | १.७५ |
| ९ | ३९ | ०.४४.५० | २.२८ |
| १० | ३६/१४ | ०.२३.०० | ०.१२ |
| ११ | ३६/१३ | ०.२९.०० | ०.२३ |
| १२ | ३६/१२ | ०.६०.०० | ०.४७ |
| १३ | ३६/११/क | ०.४६.२० | ०.३३ |
| १४ | ३६/३ | ०.५०.०० | ०.३७ |
| १५ | ३६/२ | ०.१५.०० | ०.०६ |
| १६ | ३४/१० | ०.१५.१० | ०.६२ |
| १७ | ३४/४ | ०.३१.७० | २.७६ |
| १८ | ३४/३ | ०.३०.०० | २.१६ |
| १९ | ३४/१ | ०.१०.६० | ०.८६ |
| २० | ३०/३ | ०.५४.०० | १.१५ |
| २१ | १९/३/ब | ०.२८.८० | ०.८७ |
| २२ | १८/७ | १.१७.०० | ०.४७ |
| २३ | १८/४/ब | १.०९.०० | ०.३९ |
| २४ | १८/४३ | १.०९.०० | ०.३९ |
| २५ | १७/५ | ०.०९.९० | ०.०८ |
| २६ | ४/९ | ०.७९.०० | ०.३३ |
| २७ | २/१/इ | ०.०७.०० | ०.०९ |
| २८ | २/१/ब | ०.१४.२० | १.४४ |
| २९ | ३५/२ | ०.०५.३० | ०.०५ |

**२. दिवाणसिंग चिरंजीलाल सिंग यांचे नावे असलेल्या मिळकती**

| अ.न | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | १८/५/ब/१ | १.६२.०० | ०.४४ |
| २ | ४५/८ | ४.६१.०० | २.४४ |
| ३ | ३६/१६ | ०.७७.०० | ०.५५ |
| ४ | २९/९ | १.५७.०० | ०.८१ |
| ५ | १६५/२ | १.५२.०० | १.०० |

**३.देशराजसिंग पुत्र दिवाणसिंग यांचे नावे असलेली मिळकत**

| अ.न | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | १८/९ | ०.२२.०० | ०.०९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चोदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकती विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत
दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि.२३/१०/२०२४

### धामण सापाला जीवदान!

**कोर्लई :** मुरुडच्या बाजारपेठेतील भंडारवाडा येथील प्रशांत कासेकर यांच्या घराच्या मागील वाडीत जाळ्यामध्ये रात्रभर अडकून पडलेल्या पाच फुटी धामण जातीच्या सापाला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनखात्याच्या सहकार्याने जवळील जंगलामध्ये सोडून दिले आहे. सकाळी मांजरीने गोंगाट घातल्यानंतर जाळ्यामध्ये अडकलेली धामण निदर्शनास आली. तात्काळ कासेकर यांनी सर्पमित्र संदीप घरत यांच्याशी संपर्क साधला व वनखात्यालाही पाचरण करण्यात आले. यावेळी वनरक्षक किरण गायकर, वनपाल राहुल कुलकर्णी यांच्या निरीक्षण-ाखाली जाळ्यातून धामण जातीच्या सापाला सुखरूप सोडवण्यात आले. जाळ्यामध्ये अडकल्याने स्वतःची सुटका करून घेताना ही धामण जखमी झालेली होती, जर ही लक्षात आली नसती तर त्या धामण सर्पाला जीव गमावा लागला असता.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशील श्री. दत्तात्रय बाबुराव पाटील, रा. नॅशिओ, पोस्टल कॉलनी, मैत्रीकुंज हौसिंग सोसायटी, रुम नंबर १०४, पहिला मजला, चेंबुर पश्चिम, मुंबई ४०००७१ यांनी, श्री.सुभाष लक्ष्मण पाटील व इतर १२ यांचे सामाईक मालकीची खालील नमुद केलेली भातशेती जमीन मिळकत कायमखुशीने मालकीहक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे अशिल व संबंधीत विद्यमान ज्ञात मालक यांचेमध्ये बोलणी होऊन त्यांचेसोबत व्यवहार कायम झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ओढांगी, ता.पेण | २७७ | ०-१४-९० | २-३१ |

वरील जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखीम असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे ज्ञात मालकांनी आमचे अशिलांनी दिलेला आहे. तरी देखील सदरील जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, जमीनीचे मुळ मालकाचा अगर त्यांचे वारसांचा, सहकब्जा-हिस्साधारक यांचा, कोणत्याही बँकेचा, संस्थेचा, गहाण, लिन, लिज, दान, बक्षिस, खरेदी, साठेकरार, इतर कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा, वसूली, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, महसुल वाद, दिवाणी दावा, इत्यादी काहीही असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु जमीन मिळकतीबाबत आमचे अशिल विद्यमान मालकांचे बरोबर, वर नमुद केलेल्या भातशेती जमीन मिळकतीचा अंतिम व्यवहार नोंदणीद्वारे पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर केले असे.

पेण
दिनांक : २४/१०/२०२४

**अॅड.सरिता प्रविण माळी**
फ्लॅट नंबर २०१/०९ ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स,
ए विंग, दुसरा मजला, वीर सावरकर मार्ग,
गोविंद बाग, कौंडाळतळे, मु.पो, ता. पेण,
जि.रायगड ४०२१०७
भ्रमणध्वनी क्र.८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स - २६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन/कात-५/जन्ममृत्यू/ जाहिर नोटीस/३७०२/२०२४ दि.११/१०/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

श्री. रघुनाथ धोंडू पारावे — अर्जदार
मु. बेलघर ता. तळा जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत चरई खुर्द — सामनेवाला
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्री. रघुनाथ धोंडू पारावे यांची मुलगी भारती रघुनाथ पारावे हिचा जन्म दि. ३०/१०/१९७९ रोजी मौजे बेलघर ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. ०४/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा मुलीचा जन्म दि. ३०/१०/१९७९ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचे मुलीचा जन्म नोंदीबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. आज दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स - २६९०४२**
Email ID-tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन/कात-५/जन्ममृत्यू/ जाहिर नोटीस/३६०८/२०२४ दि.९/१०/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

श्री.गणपत दगडू पालव — अर्जदार
रा. कोरखंडे, ता. तळा जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा — सामनेवाला
२. ग्रुप ग्रामपंचायत पढवण ता. तळा जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै. दगडू हरि पालव यांचा मृत्यू दि.०५/१०/१९८२ रोजी मौजे कोरखंडे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. १९/०५/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै.दगडू हरि पालव यांचा मृत्यू दि.०५/१०/१९८२ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे वडील कै. दगडू हरि पालव यांचा मृत्यू दि.०५/१०/१९८२ रोजी मौजे कोरखंडे येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक. १४ ऑक्टोंबर, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

# तनुजा माळी कुस्तीत राज्यातून पहिली

## गोरखपूरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड

**। सांगली । वृत्तसंस्था ।**

शाळेपासून ते थेट राज्य आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यासासह खेळातही चमकदार कामगिरी करत आपला ठसा उमटवला आहे. अशीच कामगिरी सांगलीतील तासगाव तालुक्यातील सावळज येथील जिल्हा परिषद शाळा क्रमांक २ ची विद्यार्थीनी तनुजा अनिल माळी हीने केली आहे. तनुजाने कुस्तीत राज्य पातळीवर पहिला क्रमांक पटकावत सुवर्ण पदकाची कमाई केली आहे. राज्य स्तरावर सुवर्ण पदक मिळवणारी तनुजा ही जिल्हा परिषद शाळेची पहिलीच विद्यार्थिनी ठरली आहे. तनुजाने कुस्तीत ४२ किलो वजनी गटात राज्यातून पहिली येण्याचा बहुमान मिळवला आहे.

तनुजाची यासह उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तनुजाच्या या कामगिरीमुळे कुटुंबासह गावात आनंदाचं वातावरण आहे. दरम्यान, तनुजाने सुवर्णपदक जिंकल्याने जिल्हा, तालुका आणि गावाचे नाव उंचावले आहे. तिच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




### शिक्षकांची साथ आणि मार्गदर्शन

तनुजाच्या या प्रवासात तिला शाळेतील शिक्षक, केंद्र प्रमुख आण्णासाहेब गायकवाड आणि मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांचे सहकार्य लाभलं. तनुजा सध्या दिग्विजय कुस्ती केंद्र, बेडग येथे सराव करतेय. तनुजा सध्या पैलवान सचिन शिंदे, नितीन शिंदे आणि अनिल माळी यांच्या मार्गदर्शनात डावपेच शिकतेय. त्यामुळे आता ग्रामस्थांसह राज्याला तनुजाकडून सुवर्ण पदकाची अपेक्षा असणार आहे. तसेच तनुजासमोर आता राष्ट्रीय पातळीवरील कुस्तीपटूंचे आव्हान असणार आहे. त्यामुळे तनुजा या कुस्तीपटूंचा कसा सामना करते? याकडे साऱ्यांचे लक्ष असणार आहे.

### अभ्यासासह कुस्तीचा सराव

तनुजा सध्या सातवीत शिकत आहे. तनुजाने वडिलांच्या प्रोत्साहानामुळे कुस्तीच्या आखाड्यात उतरण्याचे ठरवले. तनुजाने खडतर परिस्थितीतून शिक्षण घेत कुस्तीचा सरावही सुरु ठेवला. तनुजाने आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही फक्त नि फक्त जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर इथवरचा प्रवास केला आहे. राज्यस्तरीय शालेय कुस्ती २०२४-२०२५ स्पर्धेचे आयोजन हे परभणी येथे करण्यात आले होते. तनुजा या स्पर्धेत १४ वर्षांखालील ४२ किलो वजनी गटात मॅटवरील कुस्तीच्या फ्रीस्टाइल स्पर्धेमध्ये कोल्हापूरचे प्रतिनिधित्व करत होती. तुनजाने या स्पर्धेत नाशिकच्या अक्षदा सनकर हीच्यावर एकतर्फी मात केली. तुनजाने अक्षदाचा १०-० ने धुव्वा उडवत पहिला क्रमांक पटकावला आहे.

# पाकिस्तान प्रशिक्षकाची जागा घेणार पार्थिव पटेल

## बॅटिंग कोच म्हणून होणार नियुक्ती

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२५ लिलावापूर्वी फ्रेंचायझींमध्ये उलथापालथ सुरु आहे. कोचिंग स्टाफमध्ये बदल करण्यासाठी फ्रेंचायझींमध्ये चढाओढ सुरु झाली आहे. काही फ्रेंचायझींनी हेड कोच म्हणून नव्या व्यक्तींची निवड केली आहे. असे असताना आणखी एक बातमी समोर आली आहे. भारतीय संघाचा माजी विकेटकीपर फलंदाज पार्थिव पटेल पाकिस्तानचा व्हॉईट बॉल हेड कोच गॅरी कर्स्टन याची जागा घेणार आहे.

गॅरी कर्स्टन मागच्या पर्वात गुजरात टायटन्सचा फलंदाज प्रशिक्षक आणि मेंटॉर होता. मात्र गुजरात टायटन्स सोडून पाकिस्तान क्रिकेट संघाचा व्हाइट बॉल संघाचा मुख्य प्रशिक्षकपदी रूजू होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांची जागा रिक्त झाली असून गॅरी कर्स्टनच्या जागी पार्थिव पटेल गुजरात टायटन्समध्ये जागा घेऊ शकतो. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार, गुजरात टायटन्स पार्थिव पटेलला मोठी जबाबदारी देण्याच्या तयारीत आहे. पार्थिव पटेल गुजरात टायटन्सचा बॅटिंग मेंटॉर होऊ शकतो.

माजी क्रिकेटपटू आशिष नेहरा याच्या नेतृत्वाखालील कोचिंग स्टाफमध्ये सहभागी होऊ शकतो. गॅरी कर्स्टन आयपीएलमध्ये २०२२ पासून गुजरात टायटन्सचा भाग होता. २०२२ मध्ये गुजरात टायटन्सने जेतेपदावर नाव कोरले होते. त्यानंतर २०२३ मध्ये अंतिम फेरी गाठली होती. २०२४ आयपीएलमध्ये गुजरातची स्थिती ढासळली. त्यानंतर गॅरी कर्स्टनने गुजरातची साथ सोडली आणि पाकिस्तान संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्त झाला. दुसरीकडे, पार्थिव आंतरराष्ट्रीय पातळीवर देशासाठी २५ कसोटी, ३८ वनडे आणि २ टी -२० सामने खेळला आहे. तसेच २०२० पर्यंत आयपीएलमध्ये एक खेळाडू खेळाला आहे. २००८ ते २०१० पर्यंत चेन्नई सुपर किंग्ससाठी खेळला होता. त्यानंतर कोच्चि टस्कर्स केरळ, सनरायझर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि मुंबई इंडियन्स संघाचा भाग राहिला आहे.

पार्थिव पटेलने देशांतर्गत क्रिकेटमध्ये गुजरातचे प्रतिनिधित्व केले आहे. २०१६-२०१७ मध्ये रणजी ट्रॉफीत मुंबईला पराभूत करून पहिल्यांदा गुजरातला किताब मिळवून दिला होता.

# नेयमारचं यशस्वी पुनरागमन; अल हिलालचा अल ऐनवर विजय

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमारने दुखापतीमुळे एका वर्षानंतर सोमवारी स्पर्धात्मक फुटबॉलमध्ये यशस्वी पुनरागमन केले. त्याने एएफसी चॅम्पियन्स लीग एलिटच्या गट टप्प्यात अल हिलालला संयुक्त अरब अमिरातीच्या अल ऐनचा ५-४ असा पराभव करण्यात मदत केली.

नेमारने ऑगस्ट २०२३ मध्ये सौदी अरेबियाच्या अल हिलाल क्लबशी करार केला होता, परंतु गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये दुखापत होण्यापूर्वी तो त्याच्या नवीन क्लबसाठी फक्त पाच सामने खेळू शकला होता.

नेमारने चार वेळा आशियाई चॅम्पियन अल हिलालसाठी ३६९ दिवसांनंतर आपला पहिला सामना खेळला. सामना संपायला फक्त १३ मिनिटे बाकी असताना नेमार मैदानात उतरला. त्याने मैदानात येताच धारदार शॉट मारला पण तो गोल पोस्टला लागला.

अल हिलालचा या स्पर्धेतील हा सलग तिसरा विजय आहे. नेमार, १२८ सामन्यांमध्ये ७९ गोलासह त्याच्या देशाचा सर्वकालीन आघाडीचा गोल करणारा खेळाडू आहे.

दुखापतीनंतर प्रथमच खेळायला आलेला नेमार पहिल्यांदा बेंचवर होता. पण सामन्याच्या ७६ व्या मिनिटाला मैदानात उतरला. तोपर्यंत, सध्याच्या सौदी प्रो लीगचे नेतृत्व करणारा विक्रमी चार वेळचा आशियाई चॅम्पियन, रेनन लोदी आणि सर्गेज मिलिन्कोविक-सॅविक यांच्या गोलमुळे आणि सालेम अल डावसरीच्या हॅट्ट्रिकमुळे ५-३ ने आघाडीवर होता. विश्वचषक स्पर्धेत खेळण्याची तीव्र इच्छेमुळे त्याला पुनरागमन करण्याची प्रेरणा मिळाली.

# जेसन गिलेस्पीने मैदानातील कचरा उचलला

## नेटकऱ्यांनी केले कौतुक, पाकिस्तानी खेळाडू झाले ट्रोल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानची गेल्या काही वर्षात कसोटी क्रिकेटमध्ये नाचक्की झाली होती. देशात खेळताना एक सामना जिंकण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागला. इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची कसोटी मालिका सुरु आहे. दुसरा कसोटी सामना २४ ऑक्टोबरला रावळपिंडीत होणार आहे. या सामन्यापूर्वी दोन्ही संघ कसून सराव करत होते. त्यावेळी त्यांनी पाणी आणि एनर्जी ड्रींक प्यायलेल्या बाटल्या तशाच मैदान टाकल्या होत्या. खेळाडूंचे हे कृत्य पाकिस्तानचा हेड जेसन गिलेस्पीला आवडले नाही. त्यांनी तो कचरा उचलून डब्यात टाकला.



या मालिकेतील पहिला सामना गमावल्यानंतर पाकिस्तान पुन्हा तो कित्ता गिरवणार असे, वाटत होते, पण पाकिस्तानने दुसऱ्या कसोटी सामन्यात दिग्गज खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवला. तसेच दुसरा कसोटी सामनाही जिंकला. यामुळे मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. तिसरा कसोटी सामना मालिका विजयासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे दोन्ही संघ यासाठी प्रयत्नशील असतील यात शंका नाही. रावळपिंडी मैदानात प्लास्टिक बाटल्या पडल्या होत्या. पाकिस्तानी खेळाडूंनी सराव करताना या बाटल्यांचा वापर केला होता. पाणी आणि एनर्जी ड्रिंक प्यायल्यानंतर बाटल्यांचा कचरा असाच मैदानात सोडला. हे कृत्य जेसन गिलेस्पीला काही आवडलं नाही त्याने मैदानातील सर्व बाटल्या एकत्र केल्या आणि कचऱ्याच्या डब्यात टाकल्या.

गिलेस्पीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. पाकिस्तानी चाहते खेळाडूंना ट्रोल करत आहेत. पाकिस्तानी क्रीडा रसिकांनी आपल्याच खेळाडूंची शाळा घेतली. सामना जिंकण्यापूर्वी शिस्त शिकणे गरजेचे आहे, असा टोला लगावला आहे. दुसरीकडे, पाकिस्तानचा हेड कोच जेसन गिलेस्पी यांचे कौतुक केल जात आहे. इतकी मोठी व्यक्ती असूनही मैदानातील कचरा साफ करू शकते, याचे आश्चर्य वाटले. त्यामुळे पाकिस्तानी खेळाडूंनी यातून धडा घेतला पाहीजे असे नेटकरी सांगत आहेत.

पाकिस्तानने जेसन गिलेस्पीच्या खांद्यावर एप्रिल २०२४ मध्ये संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपवली होती. त्याच्या प्रशिक्षणाखाली पाकिस्तानने बांगलादेशविरुद्ध पहिली मालिका खेळली होती. या मालिकेत पाकिस्तान चीतपट झाला होता.




# ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी टीम इंडिया सज्ज

■ **ऋतुराज गायकवाड कर्णधार, इशान किशनचे कमबॅक**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणाऱ्या १५ सदस्यीय भारत अ संघाची घोषणा केली आहे. भारत-अ आणि ऑस्ट्रेलिया-अ यांच्यात दोन प्रथम श्रेणी सामने खेळवले जातील.

प्रथम श्रेणी सामन्यांच्या या मालिकेसाठी भारत-अ संघाची कमान ऋतुराज गायकवाडकडे सोपवण्यात आली आहे. भारत-अ आणि ऑस्ट्रेलिया-अ यांच्यातील दोन प्रथम श्रेणी सामने ३१ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. पहिला सामना ०३ नोव्हेंबरपर्यंत खेळवला जाईल. याशिवाय मालिकेतील दुसरा सामना ०७ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. पहिला सामना मॅके येथे तर दुसरा मेलबर्न येथे होणार आहे. शान किशनचाही भारत अ दौऱ्यासाठी समावेश करण्यात आला आहे.

### निधी भिडेची राज्यस्तरी स्पर्धेसाठी निवड

**रत्नागिरी :** सातारा येथे झालेल्या शालेय विभागस्तरीय जलतरण स्पर्धेत रत्नागिरीच्या निधी भिडेने दोन सुवर्णपदकांसह एक रौप्यपदक पटकावले. तिची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

५० व २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये तिने सुवर्णपदक आणि १००मी. ब्रेस्टस्ट्रोकमध्ये रौप्यपदक मिळवले. स्पर्धेमध्ये येथील फाटक हायस्कूलचे चार विद्यार्थी सहभागी झाले होते. १९ वर्षाखालील मुलांच्या गटांमध्ये बारावीचा यश कीरने २०० मीटर फ्री स्टाईलमध्ये कास्यपदक पटकावले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या निधीचा आणि यश कीर याचा दी न्यू एज्युकेशन सोसायटीचे कौन्सिलर शेखर शेट्ये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी फाटक हायस्कूलचे मुख्याध्यापक राजन कीर, उपमुख्याध्यापक विश्वेश जोशी, आदी उपस्थित होते.


# शुभमन गिलकडून गुजरात टायटन्स कर्णधारपद जाणार

■ **ऑलराऊंडर राशिद खानकडे संघाची धुरा?**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये पदार्पण करताच गुजरात टायटन्सने जेतेपद पटकावले. त्यावेळी गुजरात संघाचा कर्णधार होता हार्दिक पांड्या. पण पुढच्या हंगामात मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला ट्रेड करत मुंबई संघात घेतले आणि कर्णधारपदाची जबाबदारीही दिली. हार्दिक पांड्यानंतर गुजरात टायटन्सच्या कर्णधारपदाची माळ शुभमन गिलच्या गळ्यात पडली. पण २०२४ च्या हंगामात गुजरात टायटन्सची कामगिरी समाधानकारक झाली नाही. त्यामुळे आता नव्या हंगामात शुभमन गिलच्या कर्णधारपदावर गदा येण्याची शक्यता आहे.

गेल्या हंगामात गुजरात टायटन्सला प्ले ऑफमध्येही स्थान मिळवता आले नव्हते. त्यामुळे नव्या हंगामात गुजरात फ्रँचाईजीकडून नव्या कर्णधारपदाचा शोध घेतला जात आहे. गुजरात टायटन्सच्या कर्णधारपदाची धुरा ऑलराऊंडर राशिद खानकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व दहा संघांना कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार आहे याची यादी आयपीएल गव्हर्निंग काऊन्सिलकडे सोपवायची आहे. गुजरात टायटन्स राशिद खानला पहिल्या क्रमांकावर रिटेन करण्याची शक्यता आहे. याचा अर्थ नव्या हंगामात राशिद खानला १८ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. राशिद खानकडे अफगाणिस्तानचे नेतृत्व करण्याचा तगडा अनुभव आहे. याच कारणाने गुजरातच्या नेतृत्वाची धुरा राशिदकडे सोपवण्याची शक्यता वाढली आहे. गुजराज टायटन्सच्या पहिल्या हंगामात शुभमन गिलने तब्बल ८९० धावा केल्या होत्या. यात तीन शतकांचा समावेश होता. त्याचा ॲव्हरेजही ६० हून अधिक होता. पण कर्णधारपदाची जबाबदारी आल्यानंतर त्याच्यावरचा दबाव वाढलेला दिसला. २०२४ च्या हंगामात गिलने एक शतक आणि दोन अर्धशतकांसह ४२६ धावा केल्या. आयपीएलच्या नव्या हंगामात गुजराज टायटन्सच नाही तर दिल्ली कॅपिटल्स, लखनऊ सुपरजायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार बदलला जाण्याची शक्यता आहे. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतने आपण मेगा ऑक्शनसाठी उपलब्ध असू असे सूचक वक्तव्य केले होते. तर लखनऊचा संघ केएल राहुलला रिलीज करण्याची शक्यता आहे. गेल्या हंगामात कोलकाताला चॅम्पियन बनवणाऱ्या श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदावरही साशंकता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, आयीपएलच्या नव्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव यंदा देशाबाहेर होण्याची शक्यता आहे. यासाठी दुबईतल्या रियादमध्ये मेगा ऑक्शन पार पडणार असल्याचे सांगितले जात आहे. यंदाच्या मेगा ऑक्शनमध्ये अनेक दिग्गज खेळाडू उपलब्ध असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# नवा चेंडू घेण्याचा नियम बदलणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट जगतात टी-२० क्रिकेटची धुम आहे. टी-२० मालिका, टी वर्ल्ड-२० कप आणि टी-२० लीगने स्टेडिअममध्ये क्रिकेट चाहत्यांची गर्दी वाढली आहे. पण टी क्रिकेटमुळे कसोटी क्रिकेट आणि एकदिवसीय क्रिकेट काहीसे मागे पडत चालले आहे. पण आता एकदिवसीय क्रिकेटमध्ये रंगत वाढवण्यासाठी आयसीसीच्या क्रिकेट समितीने क्रांतीकारी बदलाची योजना बनवली आहे. दुबईत झालेल्या आयसीसी क्रिकेट समितीच्या बैठकीत एकदिवसीय क्रिकेटमध्ये एक नियम बदलण्याची शिफारस करण्यात आली आहे. ज्यामुळे एकदिवसीय क्रिकेट रंगतदार होणार आहे.




आयसीसीच्या क्रिकेट समितीत सौरभ गांगुली, महेला जयवर्धने, व्ही. व्ही. एस. लक्ष्मण, शॉन पॉलॉक, डेनिअल व्हिटोरी, रॉजर हार्पर आणि जय शाह उपस्थित होते. या समितीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये फक्त २५ षटकापर्यंत दोन नवे चेंडू गोलंदाज वापरु शकतील, असा प्रस्ताव दिला आहे. यानंतर उर्वरित २५ षटकं केवळ एकच चेंडू वापरता येईल. आताच्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोन्ही एंडकडून नवी चेंडूचा वापर केला जातो. एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोन नव्या चेंडूच्या वापराचा गोलंदाजांना फटका बसतो. फलंदाजांना मोठे फटके मारण्याची संधी मिळते. आयसीसीच्या सर्व सदस्या संघांच्या कर्णधारांना शिफारस पाठवण्यात आली आहे. सर्व कर्णधारांची सहमती मिळाल्यास नव्या चेंडूचा नियम बदलण्यात येणार आहे.

## फोर्ड कप स्पर्धेत खेळताना दिग्गज क्रिकेटपटूंचा विक्रम मोडला

# न्यूझीलंडचा खेळाडू चॅड बोवेसने झळकावले सर्वात जलद द्विशतक

**। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा फलंदाज चॅड बोवेसने लिस्ट ए क्रिकेटमध्ये नवा जागतिक विक्रम घडवला आहे. न्यूझीलंडमधील देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा फोर्ड कप स्पर्धेत सर्वात जलद द्विशतक झळकावत त्याने दिग्गज क्रिकेटपटूंचा विक्रम मोडत नवा विक्रम केला आहे. न्यूझीलंडमधील देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा फोर्ड कप टूर्नामेंटमध्ये ओटागो व्होल्ट्स संघाच्या गोलंदाजांची धुलाई करत त्याने लिस्ट ए मधील सर्वात जलद द्विशतक झळकावले.

कँटरबरी किंग्जचे प्रतिनिधित्व करताना, या फलंदाजाने व्हॉल्टसविरुद्ध फलंदाजी करताना १०३ चेंडूत शानदार द्विशतक झळकावले. ३२ वर्षीय बोवेसने २७ चौकार आणि सात षटकार लगावले आणि किंग्जला ५० षटकांत ९ बाद ३४३ धावांपर्यंत मजल मारता आली. बोवेसने ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड आणि भारतीय यष्टीरक्षक फलंदाज एन जगदीसन यांचा लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान द्विशतकांचा संयुक्त विक्रम मोडला. या दोन्ही खेळाडूंनी ११३ चेंडूत द्विशतक झळकावले होते. तर बोवेसने ही कामगिरी १०३ चेंडूत केली आहे. अखेरीस तो ११० चेंडूत २०५ धावा करून बाद झाला. फोर्ड कप स्पर्धेत दुसऱ्यांदा द्विशतक झळकावलेले पाहायला मिळाले आहे.

यापूर्वी २०१२-१३ मध्ये जेमी हाऊने सेंट्रल स्टॅगसाठी २२२ धावा केल्या होत्या. योगायोगाने, बोवेसची मॅरेथॉन खेळी त्याच्या १०० व्या लिस्ट ए सामन्यात पाहायला मिळाली. उजव्या हाताच्या सलामीच्या फलंदाजाने किवी संघासाठी सहा एकदिवसीय सामने आणि ११ टी-२० सामने खेळले आहेत. हे सामने त्याने २०२३ मध्ये खेळले आहेत. बोवेसने केवळ ५३ चेंडूंमध्ये आपले शतक झळकावले, ज्यामुळे ते स्पर्धेच्या इतिहासातील चेंडूंच्या दृष्टीने पाच जलद शतकांपैकी एक बनले. सर्वात वेगवान शतकाचा विक्रम न्यूझीलंडचा माजी कर्णधार रॉस टेलरच्या नावावर आहे. त्याने २०२१-२२ मध्ये सेंट्रल स्टॅगसाठी ४९ चेंडूत शतक झळकावले होते. दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या बोवेसने २०१५ मध्ये न्यूझीलंडला जाण्यापूर्वी प्रोटीज अंडर -१९ संघात आपल्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात केली. विश्वचषक स्पर्धेत त्याने दक्षिण आफ्रिकेचे नेतृत्व केले.




# देशांतर्गत क्रिकेटची स्थिती वाईट

## सुनील गावस्करांनी व्यक्त केली खंत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका सुरु आहे. दुसरीकडे, देशात प्रतिष्ठित अशी रणजी ट्रॉफी स्पर्धा सुरु आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धेला ११ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. रणजी स्पर्धेत नावलौकीक मिळवून अनेक खेळाडूंनी टीम इंडियात स्थान मिळवले आहे. मात्र या स्पर्धेची दुर्दशा झाल्याचे मत माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले आहे. काही दिग्गज खेळाडू रणजी ट्रॉफी ऐवजी ओमानमध्ये खेळल्या जाणाऱ्या इमर्जिंग आशिया कप स्पर्धेत भाग घेतला आहे. यामुळे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



सुनील गावस्कर यांच्या म्हणण्यांनुसार, भारतीय खेळाडू देशांतर्गत क्रिकेटऐवजी अन्य स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी धावत आहेत. त्यामुळे रणजी स्पर्धेचे महत्त्व कमी होत आहे.

तिलक वर्मासारखे दिग्गज खेळाडू रणजी स्पर्धेऐवजी इमर्जिंग आशिया कप स्पर्धेत इंडिया ए संघाकडून खेळत आहे. खेळाडूंना अशा पद्धतीने वेगळ्या स्पर्धेत खेळण्यासाठी नेले जात असेल, तर देशांतर्गत क्रिकेटचे महत्त्व कमी होत आहे, असे मत सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले आहे. पुढच्या महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी दक्षिण अफ्रिकेत चार सामन्यांची टी-२० मालिका होणार असल्याकडे लक्ष वेधले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)